# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### विरार येथे महिलेची अज्ञात इसमांनी खून करुन घरातील ऐवज व दागिने चोरी केल्याबाबत

**(१) १३६ (१८-०३-२०२०) श्री.रामनिवास सिंह, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार येथील ६३ वर्षीय मनिषा मनोहर ढोंबल यांचा राहत्या घरी अज्ञात इसमांनी खून करुन घरातील ऐवज व दागिने चोरुन आरोपी फरार झाल्याची घटना माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी अज्ञात इसमाविरुध्द स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून आरोपीला पकडण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खून केल्याप्रकरणी आरोपीला अटक करुन त्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२५-०३-२०२१) :** (१) श्रीमती मनिषा मनोहर डोंबल, वय ६३ वर्षे रा. विरार (प.), ता.वसई, जि.पालघर यांच्या राहत्या घरी अज्ञात आरोपींनी खून करुन घरातील ऐवज व दागिने चोरुन आरोपी फरार झाल्याची घटना दिनांक २७/१२/२०१९ रोजी घडलेली आहे.

(२) नाही. सदर प्रकरणी अज्ञात आरोपींविरुध्द विरार पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक १२३०/२०१९ भा.दं.वि.स.कलम ३०२, ३९७, ४५९ प्रमाणे दिनांक २८/१२/२०१९ रोजी खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयाचा तपास विरार पोलीसांनी केला असून गुन्हयाचे तपासाअंती आरोपी यश प्रभाकर इंदवटकर व इतर २ असे एकूण ३ आरोपी निष्पन्न करण्यात आले आहे. त्यापैकी आरोपी क्र. १ यश प्रभाकर इंदवटकर व आरोपी क्र. २ विनयकुमार गोपी टानेटी यांना दिनांक २९/१२/२०१९ रोजी अटक केली आहे. आरोपी क्र. ३ विनोद भिमसिंग पाडवी हा गुन्हा घडल्यापासून गुन्हयातील चोरीस गेलेला ऐवज व सोन्याचे दागिने असा एकूण ७,२१,२८०/- रुपयांचा ऐवज घेऊन फरार झालेला आहे. फरार आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

(३) सदर गुन्हयाचा सखोल तपास करुन अटक दोन्ही आरोपी व एक फरार आरोपी यांचेविरुध्द सबळ पुरावा गोळा करुन दिनांक २६/०३/२०२० रोजी अपर जिल्हा व सत्र न्यायालय, वसई येथे दोषारोपपत्र दाखल करुन सदर गुन्हयाची निर्गती केलेली आहे. गुन्हयाचा कोर्ट केस क्र. ४०४/२०२० असा असून तो सध्या न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कायगाव (जि.औरंगाबाद) भागात वन विभागाचे कार्यालय होणेबाबत

**(२) ७६४ (१८-०३-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापुर व गंगापुर (जि.औरंगाबाद) या दोन तालुक्यांचे मिळुन वन विभागाचे कामकाज वैजापुर येथुन होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गंगापुर तालुक्यातील कायगाव परिसरात वन्यप्राण्यांची संख्या वाढल्याने या भागातुन जाणाऱ्या औरंगाबाद-अहमदनगर राज्य महामार्गावर रस्ता ओलांडताना हरीण आणि काळविटांच्या सतत होणाऱ्या अपघातात या प्राण्यांना वेळेत उपचारही मिळत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या परिसरात स्वतंत्र वन विभागाचे कार्यालय होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०८-०६-२०२१) :** (१) वैजापूर तालुक्यात ३८७९.२९ हे. इतके तर गंगापूर तालुक्यात ३२०.०९ हे इतके वनक्षेत्र आहे.

त्यामुळे दोन्ही तालुक्यांसाठीचे वनपरिक्षेत्र कार्यालय जास्त वनक्षेत्र असलेल्या वैजापूर येथे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील गुंठेवारी क्षेत्रातील भूखंडाची नियमबाह्य पध्दतीने होत असलेली खरेदी विक्री रोखण्याबाबत

**(३) १६४१ (१८-०३-२०२०) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पाटील वतन, कुलकर्णी वतन आदी वतनांच्या गुंठेवारी क्षेत्रातील हजारो भुखंडाची जिल्हाधिकाऱ्यांच्या किंवा सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय परस्पर विक्री झालेली असून या नियमबाह्य पध्दतीने झालेले व्यवहार नियमित करावेत, अशी शासनाकडे काही व्यक्तींनी मागणी केलेली असून जमिनीच्या प्रचलित बाजारमूल्याच्या ७५ टक्के रक्कम भरल्यानंतर अशा जमिनी नियमित करण्यास मान्यता देण्याचा निर्णय

असताना सदर नियम शिथिल करुन जमिनीच्या बाजारमूल्याच्या ७५ टक्के रकमेऐवजी २५ टक्के रक्कम भरल्यानंतर अशी हजारो अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचा निर्णय माहे जुलै, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी किंवा सक्षम प्राधिकारी यांची परवागनी न घेता वतनांच्या गुंठेवारी क्षेत्रातील किती भूखंड परस्पर विक्री करण्यात आले आहेत, तसेच अशाप्रकारे नियमबाहय पध्दतीने झालेले व्यवहार नियमित करण्याची मागणी किती व्यक्तींकडून करण्यात आलेली आहे,

(३) असल्यास, नियमबाहय पध्दतीने झालेले खरेदी विक्री व्यवहार नियमित करण्यासाठी बाजारमूल्याच्या ७५ टक्के रकमेऐवजी २५ टक्के एवढी कमी रक्कम आकारण्याची कारणे काय आहेत व त्यामुळे शासनास प्राप्त होणारा किती महसूल बुडाला आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील गुंठेवारी क्षेत्रातील भुखंडाची नियमबाहृय खरेदी विक्री रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२५-०८-२०२१) :** (१), (२), (३), (४) व (५) नवीन अविभाज्य शथीने दिलेल्या इनाम/ वतन (महार वतन व देवस्थान जमीन वगळून) जमिनी ज्या भोगवटादार वर्ग-२ च्या आहेत अशा जमिनींचे अकृषिक कारणास्तव झालेली बांधकामे गुंठेवारी कायद्यांतर्गत नियमित करण्याच्या अनुषंगाने, मुंबई परगणा व कुलकर्णी वतने नाहीशी करण्याबाबतचा अधिनियम १९५०, मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५३, मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत अधिनियम, १९५५, मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहिशी करण्याबाबत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) अधिनियम १९६२ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरीता विधेयक क्र.९ विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशन, २०२१ मध्ये दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी मांडण्यात आले होते. सदर विधेयकास विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळाल्यानंतर, त्याबाबत सन २०२१ चा अधिनियम

क्र.१० दिनांक १६ जुलै, २०२१ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आलेला आहे. उक्त नमूद ५ अधिनियमांखालील जमिनींवरील अनधिकृत बांधकामे या सुधारणेन्वये यापूर्वीच गुंठेवारी अधिनियमान्वये नियमानुकूल करण्यात आलेली आहेत, अशी बांधकामे यांच्याखालील जमिनींचे व्यवहार नियमित करण्यासाठी बाजारमूल्याच्या ७५% इतक्या रकमेऐवजी २५% इतकी रक्कम अधिमूल्य म्हणून आकारण्यात येईल अशी तरतूद सदर अधिनियमांत करण्यात आली आहे. सदर सुधारणा करण्याबाबत लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. अशा स्वरुपाची नेमकी किती बांधकामे राज्यात नियमानुकूल करता येतील त्याबाबत नेमकी माहिती सदर सुधारणा अस्तित्वात आल्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्ज / निवेदनानंतर शासनास उपलब्ध होवू शकेल. सुधारणेपूर्वी त्यांचे स्वतंत्र सर्वेक्षण करण्यात आलेले नाही.

राज्यात गुंठेवारी होवून तुकडे पाडून अनधिकृतपणे खरेदी-विक्रीचे व्यवहार नोंदविले जावू नयेत यासाठी महाराष्ट्र धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्याचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम, १९४७ च्या कलम ८ब मध्ये सन २०१५ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे, या सुधारणेच्या अनुषंगाने नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक १२/७/२०२१ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व जिल्हा निबंधक यांना निर्देश दिलेले आहेत.

---

## चंद्रपूर जिल्ह्यात वाघाने नागरीकांवर हल्ले करुन ठार केल्याबाबत

**(४) ४०५३ (१७-०७-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात वाघाने नागरीकांवर हल्ले करुन राजेश दडमल कोलारा या शेतकऱ्यास तर मूल (करवन) येथील जंगलात गाई चराईसाठी नेलेल्या रमेश वेलादी या गुराख्यास ठार केल्याची घटना घडल्याचे दिनांक २६ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वाघाचे हल्ले होवून या तीन महिन्यांत जवळपास ८-१० जणांचा वाघाच्या हल्ल्यात बळी गेला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०८-०६-२०२१) :** (१) दिनांक ०७/०६/२०२० रोजी श्री.राजेश दडमल, रा. कोलारा या शेतकऱ्याचा व दिनांक २५/०६/२०२० रोजी श्री.रमेश वेलादी, रा. करवन या गुराख्याचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.
(२) माहे एप्रिल, २०२० ते माहे जुलै, २०२० या कालावधीत चंद्रपुर प्रादेशिक वनवृत्तामध्ये ४ व्यक्तींचा व ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर क्षेत्रामध्ये ५ व्यक्तींचा असे एकूण ९ व्यक्तींचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याच्या घटना निदर्शनास आल्या आहेत.
(३) चंद्रपूर प्रादेशिक वनवृत्तामध्ये वाघाच्या हल्ल्याच्या मृत्यू प्रकरणापैकी २ प्रकरणामधील NT-१ (नर) वाघास दिनांक १९/०७/२०२० व ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामध्ये वाघाच्या हल्ल्यात मृत्युच्या ४ प्रकरणामधील KT-१ (नर) वाघास दिनांक १०/०६/२०२० रोजी जेरबंद करुन बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यान, नागपूर येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे.

वन्यप्राणी संरक्षित क्षेत्रातुन बाहेर पडून मानव-वन्यप्राणी संघर्ष रोखण्याच्या दृष्टीने क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- STPF व क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी द्वारे रात्र-दिवस संरक्षित क्षेत्रात संयुक्त गस्त करुन वन्यप्राण्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवतात.
- वन्यप्राण्यांमुळे होणाऱ्या नुकसानीपोटी संबंधित नुकसानग्रस्त व्यक्तीस अथवा त्याचे कायदेशीर वारसास प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार अर्थसहाय्य अदा करण्यात येते.

- संरक्षित क्षेत्रालगतच्या गावात वन्यप्राण्यांचा वावर असलेल्या क्षेत्रात मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने घ्यावयाच्या दक्षतेबाबत ग्रामस्थामध्ये जन-जागृती करण्यात येते.
- वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पुरेसा चारा उपलब्ध होण्यासाठी आवश्यक ठिकाणी कुरण विकासाची कामे करण्यात येतात.
- उन्हाळ्यात वन्यप्राण्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता आवश्यक ठिकाणी कृत्रिम पाणवठे तयार करण्यात येतात.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठवाड्यात वन्यजीवांना विष व विजेचे झटके देऊन मारत असल्याबाबत

**(५) ४२३३ (१७-०७-२०२०) श्री.अंबादास दानवे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद विभागात जवळपास तीन ते चार हजार निलगायी, सात ते आठ हजार मोर, अंदाजे चार ते पाच हजार रानडुकरे आणि जवळपास तीन ते चार हजार काळवीट वन्यजीव आढळून येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठवाड्यात जंगले कमी झाल्याने अन्न पाण्यासाठी हे जीव मानवी वस्तीकडे आल्यावर या जीवांना विष व विजेचे झटके देऊन मारले गेल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०८-०६-२०२१) :** (१) औरंगाबाद विभागात निलगाय, मोर, रानडुक्कर व काळवीट हे वन्यजीव आढळून येतात हे खरे आहे.

(२) व (३) नांदेड वन विभागात दिनांक २३/०६/२०२० रोजी किनवट वन परिक्षेत्राअंतर्गत चिखली गावाच्या शिवारामध्ये १२ रानडुक्कर मृत अवस्थेत आढळून आल्याची घटना निदर्शनास आली आहे.

सदर प्रकरणामध्ये ६ आरोपी विरुध्द भारतीय वन्यजीव अधिनियम, १९७२ चे कलम ९, २७(४), ४८(अ), ५०(१)ब अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पूढील चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पोलीस प्राधिकरणावर सदस्यपदी फौजदारी गुन्हा दाखल असलेल्या अर्जदाराची नियुक्ती केल्याबाबत

**(६) ४७६१ (०९-०९-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोलिसांविरोधातील तक्रारीचा निपटारा करणाऱ्या सत्र न्यायालयाप्रमाणे अधिकार प्राप्त असलेल्या, पोलीस प्राधिकरणावर सदस्यपदी (नागरी समाजातील मान्यवर व्यक्ती) नियुक्ती करण्यासाठी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये गृह विभागाने वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करून इच्छुकांचे दिनांक ३ ते ९ डिसेंबर, २०१९ या कालावधीत नरिमन पॉईंट येथील प्राधिकरणाच्या कार्यालयात अर्ज करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जाहिरातीनुसार इच्छुकांनी त्यांचे नाव, गाव, पत्ता, अनुभव, व्यवसाय सोबत फौजदारी गुन्हा दाखल नसल्याबाबत, कारवाई करण्यात आली नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहिती अधिकारातून हाती आलेल्या कागदपत्रानुसार या जाहिरातीला अनुलक्षून १३ इच्छुकांनी विहित मुदतीत श्री.राजकुमार ढाकणे यांचा एक व विलंबाने अशा एकूण १४ जणांचे अर्ज निवड प्रक्रियेसाठी प्राधिकरणाने गृह विभागाला सुपूर्त केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, श्री.राजकुमार ढाकणे यांच्याविरोधात पुण्यातील कोरेगाव पार्क आणि विमानतळ पोलीस ठाण्यात सन २०१४-२०१५ मध्ये दोन गुन्हे नोंद असून त्यापैकी कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात नोंद गुन्हयात "हत्येचा प्रयत्न" या कलमाचा समावेश आहे तसेच पोलिसांच्या तावडीतून पसार झाल्याचा आरोपही त्यांच्यावर आहे. हा गुन्हा गंभीर स्वरूपाचा असून कोठडीतील चौकशी आवश्यक आहे असे निरीक्षण नोंदवत मा.सत्र न्यायालयाने त्यांचा अटकपूर्व जामीन अर्जही फेटाळला होता, या खटल्याची सुनावणी अद्याप सुरू आहे आणि असे असतानाही श्री.राजकुमार ढाकणे यांची दिनांक १४ जुलै, २०२० रोजी गृह विभागाचे प्रधान सचिव (विशेष) श्री.अमिताभ गुप्ता यांनी 'राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणाच्या सदस्यपदी' (नागरी समाजातील मान्यवर व्यक्ती) नियुक्ती करण्याबाबतची अधिसूचना निर्गमित केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने याबाबत निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०७-०९-२०२१) :** (१), (२), (३), (४), (५) व (६) राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणावर "सदस्य-नागरी समाजातील मान्यवर व्यक्ती" या वर्गात नियुक्ती करीता जाहिरात देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. यानुषंगाने प्राधिकरणास व शासनास अर्ज प्राप्त झालेले होते. यास अनुसरुन श्री.राजकुमार ढाकणे यांची नियुक्ती सदर पदावर करण्यात आली होती. तथापि, त्यांच्याविरुध्द दाखल असलेल्या गुन्हयांबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक यांनी शासनास सादर केलेला अहवाल विचारात घेऊन श्री.राजकुमार ढाकणे यांना उक्त प्राधिकरणाच्या सदस्य पदावरुन शासन अधिसूचना दिनांक ०५/०७/२०२१ अन्वये काढून टाकण्यात आले आहे.

---

## कोकणात खरिप हंगामामध्ये प्राण्यांचा हल्ला होत असल्याबाबत

**(७) ५१५६ (२३-११-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघ, बिबट्या, अस्वल, गवा, रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, मगर, हत्ती यांच्या हल्ल्यात मनुष्यहानी (मृत्यू) झाल्यास रुपये १० लक्ष, व्यक्ती अपंग झाल्यास ५ लक्ष व गंभीर जखमी झाल्यास सव्वा लक्ष खर्च शासनाकडून देण्यात येतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकणामध्ये खरिपातील भात कापणीच्या हंगामामध्ये उपरोक्त प्राण्यांबरोबरच साप, मण्यार, नाग, विंचु असे विविध प्रकारच्या प्राण्यांच्या हल्ल्यात अनेक नागरिक गंभीर जखमी होत असतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासन निर्णयात सुधारणा करून उपरोक्त प्राण्यांबरोबरच साप, मण्यार, नाग व विंचु यांचाही उल्लेख करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०८-०६-२०२१) :** (१) वाघ, बिबट्या, अस्वल, गवा (बायसन), रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, मगर, हत्ती, रानकुत्रे (ढोल), रोही (निलगाय) व वानर/ माकड (दिनांक १२/०२/२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये रोही (निलगाय) व वानर/ माकड यांचा समावेश करण्यात आला आहे.) या वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मनुष्य मृत पावल्यास मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसास रुपये १५.०० लक्ष, कायम अपंग झाल्यास रुपये ५.०० लक्ष, गंभीर जखमी झाल्यास रुपये १.२५ लक्ष व किरकोळ जखमी झाल्यास खाजगी रुग्णालयात औषधोपचाराकरीता मर्यादा रुपये २०,०००/- अर्थ सहाय्य देण्याची प्रचलित शासन निर्णयात तरतूद आहे.

(२) हे खरे आहे.

(३) गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना या योजनेंतर्गत १० ते ७५ वयोगटातील खातेदार शेतकऱ्यांना सापाच्या हल्ल्यात व्यक्ती मृत / जखमी झाल्यास कृषी विभागामार्फत अर्थसहाय्य देण्यात येते.

तथापि, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी शासन मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावानुसार वन, वनेत्तर क्षेत्रात सर्पदंशामुळे व्यक्ती मृत होणे किंवा कायमचे अपंगत्व येण्याची घटना नैसर्गिक आपत्ती या सदरामध्ये समाविष्ट करणे शक्य नसल्याने वन, वनेत्तर क्षेत्रात सर्पदंशामुळे व्यक्ती मृत होणे किंवा कायमचे अपंगत्व येण्याच्या घटनांमध्ये वन विभागामार्फत अर्थसहाय्य अदा करावे किंवा कसे या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह फेर प्रस्ताव सादर करण्याबाबत प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर जिल्हयात व शहरात विविध ठिकाणी हुक्का पार्लर सुरु असल्याबाबत

**(८) ५७०७ (१८-११-२०२०) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, श्री.निलय नाईक, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक : तारांकित प्रश्न क्रमांक ३२३ ला दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्हयात व शहरात विविध ठिकाणी हुक्का पार्लर सुरु असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हर्बल हुक्का पार्लरची परवानगी शासनाने दिली आहे काय, तसेच हुक्का पार्लरकरीता असलेल्या नियम व अटीचे उल्लंघन होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भारतीय संसदेत ई-सिगारेट व हुक्क्याबद्दल विधेयक सादर आहे, त्यामध्ये राज्य शासनाने शिफारस व भुमिका जाहीर केल्या आहेत काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैधरित्या चालणाऱ्या हुक्का पार्लरवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०१-०७-२०२१) :** (१) हे खरे आहे.

नागपुर शहर पोलीस आयुक्तालयातंर्गत माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये ८ हुक्का पार्लरवर कोटपा ॲक्ट, २००३ प्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे. सदर कारवाईमध्ये २३ आरोपींना अटक करण्यात आली असून रुपये ८,९३,६२४/- इतक्या रकमेचे अनधिकृत साहित्य जप्त करण्यात आले आहे.

तसेच, नागपूर (ग्रामीण) अंतर्गत सन २०२०-२०२१ मध्ये आजपावेतो ई-सिगारेट हुक्का पार्लर संबंधित कार्यवाही व गुन्हयांची माहिती "निरंक" आहे.

(२) हे खरे नाही.

नागपुर शहर तसेच ग्रामीण भागात कोणतेही हर्बल हुक्का पार्लर (हुक्का बार) सुरु करण्याची परवानगी देण्यात आलेली नाही.

नागपूर पोलीस आयुक्तालयातंर्गत व जिल्हादंडाधिकारी यांचे प्राधिकार क्षेत्रात नियम व अटींचे उल्लंघन होत असल्याचे व हर्बलच्या नावावरती अवैधरित्या तंबाखुजन्य पदार्थाचा नियमबाहय पुरवठा करणे, लपून-छपून हुक्का पार्लर चालविणेबाबतची माहिती मिळाल्यास पोलीसांव्दारे रेड कारवाई करण्यात येते.

(३) केंद्र शासनाने ई-सिगारेट निर्बंधांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याकरीता दिनांक १८/०९/१९ पासून लागु केलेली अधिसुचना पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ३०/०९/१९ व दिनांक ०२/१२/१९ अन्वये, सर्व संबंधित घटकांच्या निदर्शनास आणुन दिली आहे.

(४) सन २०१९ व २०२० या वर्षामध्ये खालीलप्रमाणे कोटपा अधिनियम, २००३ मधील तरतुदीनुसार हुक्का पार्लरवर कार्यवाही करण्यात आली आहे.

| वर्ष | दाखल गुन्हे | अटक आरोपी | जप्त मुद्देमाल किंमत |
|---|---|---|---|
| २०१९ | ३४ | ५८ | रुपये १३,९६,४४१/- |
| २०२० | ८ | २३ | रुपये ८,९३,६२४/- |

सिगारेट आणि इतर तंबाखु उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार व वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ या कायद्यामध्ये दिनांक ०४/१०/२०१८ रोजी सुधारणा झाली असून याव्दारे राज्यात हुक्का पार्लरवर बंदी घालण्यात आली आहे. सदर कायद्यातील तरतुदीनुसार एक ते तीन वर्षे इतक्या मुदतीच्या कारावासाची तसेच, रुपये ५०,००० ते रुपये १,००,०००/- इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेची तरतुद करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सुधारित नागरिकत्व कायदा व राष्ट्रीय लोकसंख्या सूचीचा अभ्यास करुन तयार केलेल्या अहवालाबाबत

**(९) ६५४० (१७-०३-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुधारित नागरिकत्व कायदा व राष्ट्रीय लोकसंख्या सूची यांचा अभ्यास करुन शासनाला त्याबाबतचा अहवाल देण्यासाठी मा.संसदीय कार्य मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली सहा मा.मंत्री महोदयांची दिनांक ५ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास समिती नेमण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीने आपला अहवाल शासनास केव्हा सादर केला व त्याचे स्वरुप काय आहे तसेच सदर अहवालातील शिफारशींनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२५-०६-२०२१) :** (१) हे खरे आहे. दिनांक १३ मार्च, २०२० च्या शासन निर्णयान्वये मा.मंत्री, संसदीय कार्य व परिवहन यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे.
(२) समितीने अद्याप शासनास अहवाल सादर केला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर येथील महारोगी सेवा समितीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने आत्महत्या केल्याबाबत

**(१०) ६६६० (१६-०३-२०२१) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर येथील महारोगी सेवा समितीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ.शीतल आमटे यांनी आनंदवनातील निवासस्थानी आत्महत्या केल्याची घटना दिनांक ३० डिसेंबर, २०२० रोजी घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०२-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन वरोरा, जि.चंद्रपूर येथे अकस्मात मृत्यू क्र. १०१/२० कलम १७४ दंप्रसं प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदर आत्महत्याच्या चौकशी प्रकरणी घटनास्थळी मिळून आलेल्या साहित्याचे रासायनिक व तांत्रिक परिक्षणाच्या अहवालावर मत प्राप्त करण्याकरीता प्रमुख न्यायवैद्यकशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, चंद्रपूर व संचालक, केंद्रीय न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळा, पुणे यांना अनुक्रमे पाठविण्यात आला असून त्यांच्याकडून अहवाल अद्याप अप्राप्त असल्याने पुढील चौकशी सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धानेगाव (ता.जि.नांदेड) येथील शिवारात ठेवलेल्या मालाची चोरी झाल्याबाबत

**(११) ६७१३ (१६-०३-२०२१) श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मोहनराव कदम, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धानेगाव (ता.जि.नांदेड) येथील शिवारात मोकळ्या जागेत ठेवलेले सिमेंट पोल, तार फिनिशींग, लोखंड पोल, फ्रेम इ. मालाची चोरी झाल्याने रुपये ६० हजारांचे नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुपये १६ हजारांचे चार लोखंडी पोल चोरट्यांनी चोरल्याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धानेगाव शिवारातील मालाची चोरी करणाऱ्या चोरट्यांचा तपास करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२७-०८-२०२१) :** (१), (२) व (३) तक्रारदार श्री.शेख हमीद अहमद शेख मंजूर अहमद, सेवानिवृत्त सहायक पोलीस उपनिरीक्षक यांच्या धानेगाव येथील प्लॉट वरील सिमेंट पोल व तार फेनसिंग तोडून चोरी केले प्रकरणी पोलीस स्टेशन, नांदेड (ग्रामीण) येथे दिनांक १६/१२/२०२० रोजी गु.र.नं.८५२/२०२० भा.दं.वि.कलम ३७९, ४२७, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात साक्षीदार तपासण्यात आले असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## राज्यातील राजकीय-सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याबाबत

**(१२) ६८०० (१६-०३-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ५२१८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ नोव्हेंबर, २०१४ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ अखेर पर्यंतच्या राजकीय-सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात या कालावधीत झालेल्या मराठा आरक्षण, भीमा कोरेगांव तसेच नाणार, मेट्रो कारशेड आंदोलनातील कार्यकर्त्यांना दिलासा मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राजकीय-सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०२-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) मराठा आरक्षण आंदोलन व भीमा कोरेगाव आंदोलनातील खटले दिनांक २६/१०/२०१८ च्या शासन निर्णयान्वये मागे घेण्याची कार्यवाही सुरु आहे आणि नाणार व मेट्रो कारशेड येथील आंदोलकांवरील खटले मागे घेण्याबाबत दिनांक ०२/१२/२०१९ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही सुरु आहे.

(३) शासनाचे दिनांक १६/१२/२०२० च्या शासन निर्णयान्वये राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याबाबत पोलीस आयुक्त आणि जिल्हादंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीच्या नियमित बैठका घेऊन त्यामध्ये निर्णय घेण्याची कार्यवाही करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वास्तुविशारद अन्वय नाईक यांच्या आत्महत्या प्रकरणाबाबत

**(१३) ७७३५ (१६-०३-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वास्तुविशारद अन्वय नाईक यांचे आत्महत्या प्रकरण नियम बाजूला ठेवून चुकीच्या पध्दतीने हाताळण्यात येऊन ते बंद करण्याची कार्यवाही करण्यात आल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्यामुळे याबाबत शासनाकडून माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान पुन्हा चौकशी सुरु करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरण नियमबाह्यपणे हाताळण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत सुरु करण्यात आलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२१-०९-२०२१) :** (१) सदर प्रकरणी अलिबाग पोलीस ठाणे येथे गु.र.नं.५९/२०१८ भादंविसंक ३०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास पुर्ण करुन गुन्ह्याचा “अ” समरी अहवाल मा.न्यायालयाने मंजूर केला आहे. परंतु सदर प्रकरणी फिर्यादी श्रीमती अक्षता नाईक यांनी आक्षेप घेतला व आणखी काही मुद्दयावर गुन्ह्याचा सखोल तपास करण्याची मागणी केली.

(२) सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये तत्कालिन पोलीस निरीक्षक, अलिबाग पोलीस ठाणे यांच्याकडून राहिलेल्या उणिवा आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या नियमांचे झालेले उल्लंघन या कारणास्तव फिर्यादी यांनी घेतलेल्या आक्षेपांमुळे गुन्ह्याचा पुढील तपास सुरु करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने तीन आरोपींना अटक करण्यात आली असून मा.न्यायालयाने त्यांना तात्पुरता जामिन मंजूर केला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण झाल्याने गुन्ह्याचे दोषारोपपत्र न्यायालयात सादर करण्यात आले आहे. तसेच तत्कालीन पोलीस निरीक्षक, अलिबाग पोलीस ठाणे यांची मा.पोलीस उपायुक्त, परि.३, मिरा-भाईंदर, वसई विरार आयुक्तालय यांचेकडे विभागीय चौकशी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबईतील मेट्रो तसेच आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पांच्या कामांमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(१४) ७७३९ (१७-०३-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील मेट्रो तसेच आंतरराष्ट्रीय विमानतळ इ. सिडकोमार्फत राबविण्यात आलेल्या प्रकल्पांच्या कामांमध्ये सन २०१८ मध्ये सुमारे २ हजार कोटी रुपयांची अनियमितता झाल्याचे नियंत्रक व महालेखा परिक्षकांनी (कॅग) निदर्शनास आणून सिडकोच्या कार्यपध्दतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याचे माहे मार्च, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०५-१०-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांनी दिनांक ३१/०३/२०१८ रोजी संपलेल्या वर्षाच्या सार्वजनिक उपक्रम अहवालातील प्रकरण क्र.४ मध्ये समाविष्ट नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प, मेट्रो प्रकल्प, रेल्वे प्रकल्प, पायाभुत सुविधा प्रकल्प, गृहनिर्माण प्रकल्प या संबंधीचे विविध

परिच्छेदांबाबत लेखापरिक्षण निष्कर्ष/ अभिप्राय/ शिफारशी नोंदविल्या आहेत. त्याबाबत सिडकोकडुन कृती कार्यवाही अहवाल (Action Taken Report) तयार करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मेळघाटातील (जि.अमरावती) डिजिटल व्हिलेज हरिसाल येथील वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी आत्महत्या केल्याबाबत

**(१५) ८३९८ (२१-०६-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे, श्री.रामदास आंबटकर, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाटातील (जि.अमरावती) डिजिटल व्हिलेज हरिसाल येथील वनपरिक्षेत्र अधिकारी दिपाली चव्हाण यांनी वरिष्ठ अधिकाऱ्याच्या त्रासामुळे स्वत:वर गोळी झाडून आत्महत्या केल्याची घटना दिनांक २६ मार्च, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हरिसाल येथील शासकीय निवासस्थानी दिपाली चव्हाण यांनी केलेल्या आत्महत्येच्या घटनास्थळी सुसाईट नोट आढळून आली असून वरिष्ठ वन अधिकाऱ्यांच्या मानसिक त्रासामुळे दिपाली चव्हाण यांनी आत्महत्या केल्याचा आरोप दिपाली चव्हाण यांचे पती राजेश मोहिते यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित दोषी अधिकाऱ्यांची विभागीय चौकशीची मागणी लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केल्यानंतर शासनाने आएफएस असोसिएशनच्या दबावामुळे चौकशी समिती गठीत केली, गठीत केलेल्या समितीतील काही सदस्य या प्रकरणाशी संबंधित असल्याने चौकशीबाबत शंका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, विशाखा समिती गठीत करावी, त्रयस्थ यंत्रणेकडून चौकशी करावी, असे आदेश मा.पालकमंत्री अमरावती यांनी जिल्हाधिकारी, अमरावती आणि जिल्हाधिकाऱ्यांनी मुख्य वन संरक्षकांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विशाखा समिती गठीत करुन त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२१-०९-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

आत्महत्येच्या घटनास्थळी मृतक यांनी वरिष्ठांच्या जाचाला कंटाळून आत्महत्या करीत असल्याची सुसाईड नोट मिळून आली आहे. तर मृतकाचे पती यांनी वरिष्ठाच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली असल्याचे त्यांनी जबाब दिला आहे.

(३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (माहिती, तंत्रज्ञान व धोरण), नागपूर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३१/०३/२०२१ रोजी ९ सदस्यीय समिती सदर घटना घडल्यानंतर ५ दिवसांत गठीत करण्यात आलेली आहे. सदर समिती लोकप्रतिनिधी किंवा आयएफएस असोसिएशनच्या दबावामुळे केलेली नाही. गठीत केलेल्या ९ सदस्यीय समितीमध्ये स्वर्गीय दिपाली चव्हाण आत्महत्या प्रकरणाशी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संबंध असलेला एकही सदस्य नाही.

(४) व (५) होय, हे खरे आहे.

सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने महसूल व वन विभाग शासन आदेश दिनांक २६/०३/२०२१ अन्वये श्री.विनोद शिवकुमार, उप वनसंरक्षक व महसूल व वन विभाग शासन आदेश दिनांक ३१/०३/२०२१ अन्वये श्री.एम.श्रीनिवास रेड्डी, तत्कालिन अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक यांना निलंबित करण्यात आलेले आहे. यथावकाश तपासाच्या अनुषंगाने श्री.विनोद शिवकुमार यांच्याविरुध्द दिनांक २१/०५/२०२१ रोजी खटला दाखल करण्यात आला असून श्री.एम.श्रीनिवास रेड्डी यांच्याविरुध्दचा गुन्हा मा.उच्च

न्यायालयाने रद्द केला आहे. अपर पोलीस महासंचालक यांनी सादर केलेल्या प्राथमिक अहवालाच्या आधारे श्री.एम.श्रीनिवास रेड्डी यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या निवासस्थानासमोर स्फोटकांनी भरलेली मोटार सापडल्याबाबत

**(१६) ८५१० (१४-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रख्यात उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या मुंबईतील “अँटिलिया” या निवासस्थानासमोर स्फोटकांनी भरलेली मोटार सापडल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१५-०७-२०२१) :** (१) होय.
(२) या प्रकरणी दिनांक २५/०२/२०२१ रोजी गांवदेवी पोलीस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्रमांक ३५/२०२१, कलम २८६,४६५, ४७३, ५०६(२), १२०(ब) भा.दं.वि. सह भारतीय स्फोटके कायदा १९०८ मधील कलम ४(अ)(ब)(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर सदरचा गुन्हा गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई येथे पुढील तपासाकरीता वर्ग करण्यात आला होता.

शासनाच्या दिनांक ०६/०३/२०२१ रोजीच्या आदेशान्वये नमूद गुन्ह्याचा तपास दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथे वर्ग करण्यात आला. दहशतवाद विरोधी पथक येथे गुन्हा नोंद क्रमांक १०/२०२१

अन्वये तपासावर घेऊन दिनांक ०७/०३/२०२१ ते दिनांक १०/०३/२०२१ या कालावधीत दहशतवाद विरोधी पथकामार्फत तपास करण्यात आला. केंद्रीय गृह मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक ०८/०३/२०२१ रोजीच्या आदेशान्वये, शासन पत्र दिनांक १०/०३/२०२१ नुसार सदरचा गुन्हा पुढील तपासकामी राष्ट्रीय तपास यंत्रणा (NIA) कडे वर्ग करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास राष्ट्रीय तपास यंत्रणा (NIA) मुंबई करीत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील यंत्रमाग उद्योगासाठी विशेष मदत व आर्थिक सहाय्य देण्याबाबत

**(१७) ८५५२ (१४-०६-२०२१) श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे : तारांकित प्रश्न क्रमांक ६५७० ला दिनांक २ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सुरुवातीला १ एप्रिलपासून निर्बंध आणि १५ एप्रिलपासून संपूर्ण टाळेबंदी लावण्यात आल्यामुळे राज्यातील वस्त्रोद्योग, तसेच त्यावर अवलंबून असलेले इतर छोटे-मोठे उद्योग आणि कामगार अडचणीत आल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कारखान्यामध्ये कामगारांची राहण्याची व्यवस्था असलेल्या उद्योगांना शासनाने परवानगी दिली असली तरी राज्यात कामगारांच्या निवासाची सोय कारखान्यांकडे नसल्याने ९० टक्के यंत्रमाग बंद होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील यंत्रमाग उद्योग पूर्वपदावर येण्यासाठी अडचणीत असलेल्या या लघुउद्योगासाठी शासन विशेष मदतीची व आर्थिक सहाय्याची योजना जाहीर करणार आहे काय, याबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील यंत्रमाग उद्योगासाठी विशेष मदत व आर्थिक सहाय्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख (०८-०९-२०२१) :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.
(३) राज्य शासनामार्फत राज्यातील यंत्रमागाच्या विकासासाठी यंत्रमाग घटकाला राज्य शासनाने जाहीर केलेल्या वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ नुसार भांडवली अनुदान व वीज दरात सवलत दिली जाते.

तसेच केंद्र पुरस्कृत Pilot Scheme of In-situ upgradation of Plain Powerloom For S.S.I. Sector अंतर्गत साध्या यंत्रमागांना जोडतंत्र प्रदान करण्याकरीता केंद्र शासनाकडुन ज्या यंत्रमागधारकांना अर्थसहाय्य प्राप्त होईल, अशा यंत्रमागधारकांना केंद्र शासनाने प्रति यंत्रमाग निश्चित केलेल्या किंमतीच्या प्रमाणात राज्य शासनाकडुन सर्वसाधारण प्रवर्गासाठी ३५ टक्के (केंद्र शासन ५० टक्के), अनुसूचित जाती करीता २० टक्के (केंद्र शासन ७५ टक्के), अनुसूचित जमाती करीता ८ टक्के (केंद्र शासन ९० टक्के) या प्रमाणात अर्थसहाय्य देण्याबाबतचा निर्णय वस्त्रोद्योग धोरणात घेण्यात आलेला आहे.

राज्यातील यंत्रमागधारकांपैकी साध्या यंत्रमाग धारकांनी शासन निर्णयापूर्वी विविध बँका किंवा वित्तीय संस्थाकडून घेतलेल्या व थकीत असलेल्या कर्जावर ५ टक्के व्याज अनुदान सवलत ५ वर्षाकरीता देण्याच्या अनुषंगाने “साध्या यंत्रमाग धारकांना व्याज सवलत” ही योजना शासन निर्णय दिनांक ०५ डिसेंबर, २०१७ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पीक विमा कंपन्याच्या नफेखोरीबाबत

**(१८) ८६११ (१४-०६-२०२१) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.जयंत पाटील, श्री.किशोर दराडे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.रामदास आंबटकर, श्री.विप्लव बाजोरिया, श्री.रामराव पाटील, श्री.अंबादास दानवे, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत चार वर्षात खाजगी विमा कंपन्यांनी विमा हप्त्यापोटी रुपये २३ हजार १८० कोटी जमा करुन त्यातून केवळ रुपये १५ हजार ६२२ कोटी वाटप केल्याने शेतकऱ्यांना पीक विम्याचे कवच देण्याच्या नावाखाली खाजगी विमा कंपन्या शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे देण्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे माहे मे, २०२१ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रब्बी हंगाम २०१९ मध्ये केवळ १.६७% रक्कम, खरीप हंगाम २०२० मध्ये केवळ १५.७९% रक्कम तर रब्बी हंगाम २०२० मध्ये एक रुपयाही शेतकऱ्यांना विमा कंपन्यांनी वाटप केलेले नाही, तर सन २०२०-२०२१ हंगामात पीक विमा कंपन्यांनी सुमारे रुपये ५ हजार कोटी नफा कमवला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अकोला व वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी गत खरीप हंगामात पीक विम्यापोटी रुपये १३६ कोटी विमा हप्ता खाजगी विमा कंपन्यांकडे जमा करुन शेतकऱ्यांना केवळ रुपये ७७ कोटी विम्याचा लाभ मंजूर झाल्याने विमा कंपन्यांची नफेखोरी निदर्शनास आली असून कन्नड (ता.जि.औरंगाबाद) येथे गत वर्षी खरीप हंगामातील कापूस व मका पिकांचे नुकसान होऊनही शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत मिळाली नाही, तसेच गंगाखेड (जि.परभणी) तालुक्यात माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या तूर उत्पादक शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत मिळाली नसल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केंद्र व राज्य शासनाकडून विमा हप्त्यापोटी जमा केलेल्या रकमा व प्रत्यक्षात शेतकऱ्यांना वाटलेली नुकसान भरपाई याची आकडेवारी तपासल्यानंतर विमा कंपन्यांची नफेखोरी निदर्शनास आली आहे, अब्जावधी रुपयांचा नफा कमावणाऱ्या विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे देण्यास दुर्लक्ष करण्यात येत असल्याने सदर विमा कंपन्यांना कृषी आयुक्त धीरज कुमार यांनी वारंवार नोटिसा पाठवूनही विमा कंपन्यांवर कोणतीही कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विमा कंपन्यांची नफेखोरी रोखण्याबाबत, पीक विम्याचे पैसे देण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या कंपन्यावर कारवाई करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना विम्याचा लाभ मिळण्याकरीता विमा कंपन्यांची जाचक अटीमध्ये सुधारणा करुन नियमावली जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०६-०९-२०२१)** : (१) हे खरे नाही.

योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार खरीप २०१६ ते रब्बी २०२०-२०२१ या ५ वर्षा मध्ये विमा कंपन्यांना एकूण विमा हप्ता पोटी रक्कम रुपये २३१७८ कोटी देण्यात आले असून विमा कंपनीमार्फत नुकसान भरपाई रक्कम रुपये १५७७७ कोटी निश्चित करण्यात आली आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार रब्बी हंगाम २०१९ मध्ये १.७१% रक्कम, खरीप हंगाम २०२० मध्ये १८.६८% रक्कम शेतकऱ्यांना विमा कंपन्यांनी वाटप केलेले आहे. तर रब्बी हंगाम २०२०-२०२१ मधील नुकसान भरपाई अद्याप निश्चित झालेली नसून नुकसान भरपाई निश्चितीची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे नाही.

योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार खरीप हंगाम २०२० मध्ये अकोला जिल्हयातील पात्र १.०७ लाख शेतकरी अर्जदारांच्या बँक खात्यावर नुकसान भरपाई रक्कम रुपये ८१.६९ कोटी जमा करण्याची कार्यवाही करण्यात येत

आहे. तसेच वाशिम जिल्ह्यातील पात्र ०.२४ लाख शेतकऱी अर्जदारांच्या बँक खात्यावर नुकसान भरपाई रक्कम रुपये २०.१६ कोटी जमा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार खरीप हंगाम २०२० मध्ये औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील कापूस पिकाकरीता पात्र १२१ शेतकऱी अर्जदारांच्या बँक खात्यावर नुकसान भरपाई रक्कम रुपये ३.२२ लाख जमा करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच मका पिकाकरीता पात्र २०७ शेतकऱी अर्जदारांच्या बँक खात्यावर नुकसान भरपाई रक्कम रुपये ७.१६ लाख जमा करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार खरीप हंगाम २०२० मध्ये परभणी जिल्ह्यातील गंगाखेड तालुक्यातील तूर पिकाकरीता १४७९१ पात्र शेतकऱी अर्जदारांच्या बँक खात्यावर नुकसान भरपाई रक्कम रुपये १२.६० कोटी जमा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रधानमंत्री पीक विमा योजना ही केंद्र शासनाची योजना असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात राबविण्यात येत आहे.

योजनेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार निश्चित करण्यात आलेली नुकसान भरपाई शेतकऱ्यांना वितरीत करणे बाबत विमा कंपन्यांना कळविण्यात आले आहे.

(५) बीड मॉडेल (Cup & Cap Model) प्रमाणे संपूर्ण राज्यभर प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविणेसाठी मान्यता देणेबाबत दिनांक २० जानेवारी, २०२१ रोजी केंद्र शासनास प्रस्ताव सादर केला असून त्यानुषंगाने पाठपुरावा सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यातील मंजूर विहिरींची कामे पूर्ण करण्याबाबत

**(१९) ८६३० (१५-०७-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यात नव्याने २६८ वैयक्तिक सिंचन विहिरींच्या कामांचे कार्यारंभ आदेश निघुनही केवळ ज्या जागेवर विहिर खोदायची आहे त्या जागेच्या जिओ टॅगिंग फोटो घेतला नसल्याने फुलंब्री तालुक्यातील सुमारे १५० विहिरींची कामे प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २६८ मंजूर विहिरींपैकी केवळ ८४ विहिरींची कामे प्रत्यक्षात सुरु झाली असून तालुक्यातील शेकडो विहिरी जिओ टॅगिंगच्या प्रतिक्षेत असण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विहिरींची कामे प्रलंबित ठेवणाऱ्या दोषींवर कारवाई करुन मंजूर विहिरींची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (२८-०९-२०२१) :** (१) व (२) हे खरे नाही.

माहे एप्रिल, २०२१ मध्ये फुलंब्री, जि.औरंगाबाद तालुक्यातील नव्याने २६८ वैयक्तिक सिंचन विहिरीची कामे मंजूर करण्यात आलेले होते. सदरील कामांना कार्यारंभ आदेश देण्यात येऊन त्याचे जिओ टॅगिंग झालेले असून सर्व कामे प्रगतीपथावर आहेत. सदर कामे नरेगा संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## एकतुनी (जि.औरंगाबाद) गावातील शेतकऱ्यांना शेततळ्याचे अनुदान देण्याबाबत

**(२०) ८६३२ (१५-०७-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकतुनी (ता.पैठण, जि.औरंगाबाद) गावातील शेतकऱ्यांना “मागेल त्याला शेततळे” या शासनाच्या योजनेंतर्गत अनुदान मंजूर झाले असून या गावातील ३३ शेतकऱ्यांना शेततळ्याचे अनुदान मंजूर होऊनही शेतकऱ्यांनी योजनेंतर्गत

शेततळ्याचे खोदकाम केले असतानाही अनुदानाचे पैसे मिळाले नसल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना शेततळ्याचे अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (१५-०९-२०२१) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

नियोजन विभागाच्या दिनांक १७ फेब्रुवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये “मागेल त्याला शेततळे” योजना सुरु करण्यात आली. योजना सुरु झाल्यापासून आतापर्यंत पैठण तालुक्यातील मौजे एकतुनी गावामध्ये एकूण ७२ शेततळे पूर्ण झाले असून त्यापैकी ३९ शेततळ्यांचे अनुदान अदा करण्यात आले असून उर्वरित लाभार्थ्यांचे अनुदान देण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. निधी उपलब्ध होताच अनुदान वितरित करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद शहरातील अंमली पदार्थ तस्करी रोखण्याबाबत

**(२१) ८६३९ (१५-०७-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरातील विविध वसाहतीमधील गांजा विक्रेत्यांना ठोक विक्रीसाठी ओडिशामधून आणलेला रुपये १ लाख ४३ हजार ८६० किंमतीचा ४७ किलो १९३ ग्रॅम गांजा पोलीस आयुक्तांच्या विशेष पथकाने जप्त केल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अंमली पदार्थ तस्करी करणाऱ्यांवर कारवाई करुन अंमली पदार्थांची तस्करी रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०५-१०-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी एम.आय.डी.सी., सिडको पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १७०/२०२१ कलम ८(c), २० (B)(ii), (क), २९ NDPS ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी पाच आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्या विरोधात दोषारोप दाखल करण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

## मराठवाड्यातील सिंचन विहिरींची कामे पूर्ण करण्याबाबत

**(२२) ८६४० (१५-०७-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाड्यात पाणी प्रश्न सोडविण्यासाठी सार्वजनिक सिंचन विहिरींची कामे पूर्ण करण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या जिल्हापरिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना विभागीय आयुक्तांकडून कारणे दाखवा नोटीसा बजाविण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कारणे दाखला नोटीसींवर खुलासा सादर करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सिंचन विहिरींच्या कामांकडे दुर्लक्ष करणाऱ्यांवर कारवाई करुन सिंचन विहिरींची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (२८-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, खुलासा सादर करण्यात आला आहे.
(३) सार्वजनिक पाणीपुरवठा विहिरींची कामे बहुतांश ठिकाणी नदी/तलावाच्या बुडीत क्षेत्रात घेण्यात आलेली आहेत. सन २०२० मध्ये झालेल्या पावसामुळे बुडीत क्षेत्रात जमा झालेल्या पावसाच्या पाण्यामुळे विहिरीचे खोदकाम करताना अडचणी आलेल्या आहेत. यामुळे मुदतीत विहिरीची कामे पूर्ण करणे शक्य झाले नाही. तसेच, जिल्ह्यात माहे मार्च-२०२१ पासून कोरोना रोगाच्या

प्रादुर्भावामुळे सार्वजनिक पाणीपुरवठा विहिरीच्या कामांसाठी पुरेशा प्रमाणात मजुर उपलब्ध होऊ शकले नाही. तथापि, उर्वरित कामे तात्काळ करुन घेण्याबाबत दक्षता घेण्याचे निदेश विभागातील सर्व जिल्हाधिकारी यांना विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडून देण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात दुधाला दरवाढ व अनुदान देण्याबाबत

**(२३) ८६५१ (२१-०६-२०२१) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे** : सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे एप्रिल व मे, २०२१ मधील लॉकडाऊन कालावधीत दूधाचे दर रुपये २३ ते २५ पर्यंत कमी झाले असून तद्नंतर दुधाची मागणी कमी झाल्यामुळे दुधाचे दर कमी होऊन दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध रुपये १८ ते रुपये १९ लिटर भावाने विकावे लागत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणी अभावी सहकारी आणि खाजगी दूध संकलक सोसायट्यांनी बंद केलेले दूध संकलन व पशुखाद्याचे दिवसेंदिवस वाढत असलेले दर या दुहेरी आर्थिक संकटात दूध उत्पादक शेतकरी सापडला असून मा.मुख्यमंत्र्यांनी लॉकडाऊनसदृश्य कडक निर्बंधाची घोषणा करताना समाजातील काही घटकांना आर्थिक सहाय्य जाहीर केले, मात्र त्यामध्ये दूध उत्पादक शेतकऱ्यांचा समावेश नव्हता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आर्थिक संकटात असलेल्या दूध उत्पादक शेतकऱ्याला मदत होण्याकरिता शासनाने दूध दरात वाढ करुन प्रतीलिटर रुपये ३० याप्रमाणे दूध खरेदी करावी किंवा प्रतीलिटर रुपये ५ या दराप्रमाणे दूध उत्पादकांना अनुदान द्यावे, अशी मागणी राज्यातील दूध फेडरेशनने शासनाला केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दुधाला दरवाढ व अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार (२५-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही, राज्यामध्ये माहे एप्रिल, २०२१ व मे, २०२१ या लॉकडाऊन कालावधीमध्ये शासनाचे दूध खरेदी दर रुपये २५/- प्रति लिटर असा होता.त्याचवेळेस सदर कालावधीत राज्यातील खाजगी व सहकारी दूध संघांचे दूध खरेदी दर रुपये २३/- ते रुपये २९/- प्रति लिटर याप्रमाणात होते.
(२) हे खरे नाही. शासनाने लॉकडाऊन कालावधीमध्ये दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हिताकरीता दिनांक ३ एप्रिल, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये २५/- प्रति लिटर या दराने प्रतिदिन १० लक्ष लिटर दूध स्विकृतीची योजना ६ महिन्यांच्या कालावधीकरीता राबविली होती. सदर योजनेंतर्गत रुपये २८७ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघाने अशा प्रकारची मागणी शासनाकडे केलेली नाही. तथापि, दूध उत्पादक शेतकरी, संघर्ष समिती व अखिल भारतीय किसान सभा यांनी दूध दरवाढीची मागणी केली आहे.
(४) व (५) दूधाला स्थिरभाव/ हमीभाव देण्यासंदर्भात अधिनियम तयार करण्याच्या दृष्टीने तपासणी करण्यात येत आहे.

---

## पालम (जि.परभणी) नगरपंचायतीमधील आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२४) ८६९१ (११-०६-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक ३००१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालम (जि.परभणी) नगरपंचायती मधील विविध गैरव्यवहाराप्रकरणी मुख्याधिकारी यांची विभागीय चौकशी, ठेकेदाराकडून १ कोटी १० लक्ष रूपयांची वसूली, कन्सलटन्ट अभियंताविरूध्द कारवाई तसेच नगराला इंडिया प्रा.लि. कंपनीस काळया यादीत टाकणे, पोलीस ठाण्यात गुन्हे नोंदविणे, थर्ड पार्टी ऑडीटरची चौकशी करणे व इतर प्रकरणी कोणतीही सक्षम कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त गैरव्यवहाराबाबत शासनामार्फत उच्चस्तरीय कारवाई करण्यात यावी अशी मागणी/तक्रार परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे सन २०२१ मध्ये वा त्यादरम्यान ई-मेलद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने मुद्देनिहाय चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची थोडक्यात व सविस्तर सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) अशा आशयाची तक्रार नगरविकास विभागात प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(३) जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, जिल्हाधिकारी, परभणी यांनी उपविभागीय अधिकारी, गंगाखेड यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीमार्फत प्रशासकीय बाबी तपासल्यानंतर तांत्रिक बाबी तपासण्यासाठी जिल्हाधिकारी परभणी यांनी उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, गंगाखेड व इतर नगरपरिषदेतील अभियंता यांच्यामार्फत समिती गठीत करुन रितसर तांत्रिक तपासणी करण्यात आली.

उक्त चौकशी समितीच्या अभिप्रायानुसार कामात दोषी आढळलेल्यांवर खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली असल्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी अहवाल सादर केला आहे :-

(क) संबंधित ठेकेदाराकडून स्वखर्चाने रुपये ४८,१८,४९२/- इतक्या रुपयाचे कमी प्रमाणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

(ख) ज्या कामात सुधारणा करणे अवघड असल्याने रुपये ११,०१,७८५/- इतकी ठोक रक्कम ठेकेदाराकडून वसूल करण्यात आली आहे.

(ग) सदर कामाशी संबंधित सल्लागार अभियंता यांच्याविरुध्द पालम येथील पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांचे व संबंधित ठेकेदाराचे नाव नगर पंचायत पालम यांनी काळ्या यादीत टाकले आहे.

(घ) सदर कामामध्ये Third Party Audit ची तपासणी बरोबर झाली नसल्यामुळे जिल्हाधिकारी, परभणी यांच्या कार्यालयाकडून प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड यांना कारणे दाखवा नोटिस देण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी, परभणी यांनी तत्कालीन मुख्याधिकारी, नगरपंचायत पालम यांच्याविरुध्द कर्तव्यात कसूर केल्याबाबत तसेच ठेकेदारास काम न करता रक्कम अतिप्रदान केल्याबाबत प्रस्तावित केलेल्या विभागीय चौकशीच्या अनुषंगाने नगरपंचायत अभियंता, लेखापाल व पदाधिकारीही जबाबदार असल्याचे आढळून आल्याने त्यांच्याबाबतची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मागविण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परभणी येथील वक्फ बोर्डाच्या जमिनी ताब्यात घेण्याबाबत

**(२५) ८७०७ (२०-०७-२०२१) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वक्फ मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील सर्व्हे नंबर १, २ व ३ मधील वक्फ बोर्डाच्या (खिदमतमास) असलेल्या जमिनींच्या स्वरुपात बदल होवू शकत नसून बेकायदेशीर अतिक्रमणधारकांना नियमबाह्यरित्या नियमितही करता येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील जमिनी अल्पसंख्यांक विभागाने ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही करावी अशी मागणी परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग यांच्याकडे सन २०२१ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदानाव्दारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार अल्पसंख्यांक विकास विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सविस्तर माहिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.नवाब मलिक (३०-०९-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

(३) प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने सादर केलेल्या अहवालानुसार, परभणी येथील सर्वे नं.१,२,३ ही मिळकत आशुरखाना नाले हैदर मस्जीद मेहताब अली शाह, परभणीची सेवा इनाम जमीन असून शासन राजपत्र दिनांक ०२/०५/१९७४ भाग-क च्या अनुक्रमांक १३ वर आहे ही मानीव नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदरील इनाम जमीन निजाम काळातील वक्फ जमीन असून सन १९५१ च्या गांव नमुना नं.९ (इनाम जमीनीचे पत्रक) मध्ये तसेच खसरापत्रक व पाहणीपत्रक मध्ये इनाम मिळकत असल्याची नोंद आहे. सदरील वक्फ मिळकती पैकी काही भाग मराठवाडा वक्फ बोर्डाने जनता व्यापारी संस्थेला दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टयावर दिला होता. तसेच काही भूखंड जनता मर्कंटाईलला दिलेला आहे जनता मार्केटच्या उत्तरेकडील भूखंड नगर परिषद, परभणीमार्फत आरक्षित करुन त्यावर मोंढा मार्केट इ. घेण्यात आले आहे. सदरील भूखंड वगळता उरलेल्या जमीनीवर बऱ्याच लोकांचे अनधिकृत ताबे असून त्यांनी प्रॉपर्टी कार्डवर तसेच नगर परिषदेच्या रिव्हीजन रेकॉर्डला नाव लावून खोटे रेकॉर्ड तयार केलेले आहे.

या संदर्भात वक्फ मंडळाकडून वक्फ अधिनियम, १९९५ च्या कलम ५४ नुसार करण्यात आलेल्या कार्यवाहीस महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे दावा क्र.३२/२००४ अन्वये आव्हान देण्यात

आलेले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. याशिवाय यासंदर्भात प्रकरण ३१/२००७ हा आणखीन एक दावा वक्फ न्यायाधिकरणापुढे न्यायप्रविष्ट आहे. शिवाय सदर प्रकरणी झालेले बेकायदेशीर अतिक्रमण व बांधकाम काढून टाकणेबाबत तसेच खरेदी विक्री थांबविणेबाबत आयुक्त, महानगरपालिका, जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, तहसलिदार, जिल्हा भूमी अभिलेख, नगर भूमापन अधिकारी, परभणी यांना वक्फ मंडळाकडून पत्र देण्यात आलेली आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना फ्रंटलाईन वर्करचा दर्जा देण्याबाबत

**(२६) ८७१९ (१३-०७-२०२१) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोविड-१९ साथीच्या संसर्गामुळे राज्यात कृषी विभागातील ६० पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारी यांचा मृत्यू झाल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना फ्रंटलाईन वर्करचा दर्जा देण्यात यावा, अशी मागणी महाराष्ट्र कृषी महासंघाने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२३-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) फ्रंटलाईन वर्करचा दर्जा देणे ही बाब सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील आहे. त्यानुसार कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना फ्रंटलाईन वर्करचा दर्जा देणेबाबत सार्वजनिक आरोग्य विभागास प्रस्ताव सादर केला असता, विभागाच्या प्रस्तावास सार्वजनिक आरोग्य विभागाने सहमती दिलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईत युरेनियमची विक्री करणाऱ्यावर कारवाई करण्याबाबत

**(२७) ८७३६ (१४-०६-२०२१) श्री.महादेव जानकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अणुबॉम्ब तयार करण्यासाठी लागणारे सुमारे २१ कोटी ३० लाख किंमतीचे ७ किलो युरेनियमची अवैध विक्री करण्याच्या प्रयत्नात असलेल्या दोघांना मुंबईत महाराष्ट्र दहशतवादी विरोधी पथकाने अटक करुन युरेनियम जप्त केल्याचे दिनांक ७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत युरेनियमची विक्री होत असल्याने सर्वत्र भितीचे वातावरण निर्माण झाले असून याप्रकरणी अटक केलेल्या दोन व्यक्ती व सदर घातक तस्करी करणाऱ्या टोळीवर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (१४-१०-२०२१) :** (१) सदर घटना दिनांक १४/०२/२०२१ रोजी निदर्शनास आली.

(२) याप्रकरणी अटक केलेल्या दोन व्यक्ती व सदर घातक तस्करी करणाऱ्या टोळीवर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केल्याबाबत कोणतेही पत्र, निवेदन विभागास प्राप्त नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी २ आरोपीविरूध्द दहशतवाद विरोधी पथक, काळाचौकी पोलीस ठाणे येथे गु. र. क्र. १४/२०२१ कलम २४ (१)(अ) अटोमिक एनर्जी कायदा, १९६२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालु असताना नमूद गुन्ह्यात कलम २८६ भा.दं.वि. सह ४ (डी) सह ६ ए(१)(२) सह ६ (बी) सह स्फोटक कायदा, १८८४ सह २ (बी) सह ५ स्फोटक पदार्थ कायदा, १९०८ या कलमांची वाढ करण्यात आली आहे.

गृह मंत्रालय, भारत सरकार यांचे दिनांक ०८/०५/२०२१ रोजीचे आदेश क्र. ११०११/३१/२०२१/NIA अन्वये नमुद गुन्ह्याचा पुढील तपास राष्ट्रीय तपास यंत्रणा (N.I.A.), मुंबई यांना दिनांक १२/०५/२०२१ रोजी वर्ग करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नांदगाव, मनमाड व मालेगाव (जि.नाशिक) तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांवर हल्ले झाल्याबाबत

**(२८) ८८५० (१४-०६-२०२१) श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लॉकडाऊन निर्बंध, संचारबंदी आदेशाची अंमलबजावणी व नियमित कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांवर हल्ले होण्याचे प्रकार वाढत असून नांदगाव, मनमाड व मालेगाव (जि.नाशिक) तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांवर माहे मे, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात तीन वेळा हल्ल्याचे प्रकार घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पोलीसांवर हल्ले करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०२-०९-२०२१) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

मांडवड आहेर वस्ती, नांदगांव येथे कर्तव्यावर असलेले पोलीस कर्मचारी यांना शिवीगाळ तसेच धक्काबुक्की केल्याने व शासकीय कामात अडथळा आणल्यामुळे नांदगांव पोलीस ठाणे येथे गु.र.नं.३८३/२०२१ भादंवि कलम ३५३, १८६, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून सदर गुन्ह्यामध्ये चार आरोपींपैकी एका आरोपीस अटक करण्यात आली असून तीन आरोपींना अटकपुर्व जामीन मंजूर केला आहे. सदर आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात येत आहे.

कृषी उत्पन्न बाजार समिती, मनमाड येथे कर्तव्यावर असलेले पोलीस कर्मचारी यांना शिवीगाळ केल्याने तसेच धक्काबुक्की केल्याने व शासकीय कामात अडथळा आणल्यामुळे मनमाड शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.३९७/२०२१ भादंवि कलम ३५३, ३२३, ५०४, ५०६, ३४, १८८, २६९, २७० सह आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ कलम ५१-१ व साथरोग प्रतिबंधक कायदा १९८७ क २, ३, ४ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून सदर गुन्हयामध्ये तीन आरोपींपैकी एका आरोपीस अटक करण्यात आली असून दोन आरोपींना जामीन मंजूर केला आहे. सदर आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे. तपास सुरु आहे.

झोडगेनाकाबंदी व देवारपाडे फाटा, ता.मालेगांव येथे नाकाबंदी असतानाही कर्तव्यावर असणारे पोलीस कर्मचारी यांच्या कामामध्ये अडथळा आणल्यामुळे त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार मालेगांव तालुका पोलीस ठाणे येथे गु.र.नं.४३९/२०२१ भादंवि कलम ३५३, २७९, ४२९, ४२७, सह गोवंश सुधारणा अधिनियम २०१५ चे कलम ५ (अ)(९) सह प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंधक करणे बाबतचा अधिनियम १९६ कलम ११(४), सह मोटावाहन कायदा कलम १८४ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्हयांमध्ये एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. तपास सुरु आहे.

लेंडाणे शिवार, मालेगांव येथे कर्तव्यावर असलेले पोलीस कर्मचारी यांना दम देणे, अंगावर धावून येणे व शासकीय कामात अडथळा आणल्यामुळे मालेगांव तालुका पोलीस ठाणे गु.र.नं.४१४/२०२१ भादंवि कलम ३५३, ३४१, ५०४, ५०६, ३४, १८८, २६९ मु.प्रो.का.क.६५ ई प्रमाणे गुन्हा दाखल केला असून सदर गुन्हयामध्ये तीन आरोपीस अटक करण्यात आली असून तीन आरोपींना मा.न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. अधीक तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईत भिक्षेकरीमुक्त मुंबई अभियान प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(२९) ८८९१ (१४-०६-२०२१) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलिसांनी जाहीर केलेले भिक्षेकरीमुक्त मुंबई अभियान केवळ कागदावरच यशस्वी होत असल्याचे माहे मार्च, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले असून मुंबई पोलिसांनी हजारपेक्षा अधिक नागरिकांची भिक्षेकरी म्हणून स्वीकारगृहात रवानगी केलेले ९० टक्के नागरिक भिक्षेकरी नसल्याचे सिध्द झाल्यामुळे त्यांनाही सोडून देण्याची वेळ आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिसांनी भिक्षेकरी म्हणून पकडलेल्या आणि मा.न्यायालयाने दोषमुक्त केलेल्यांमध्ये नाका कामगार, रस्त्याकडेला राहणारे विक्रेते, त्याचबरोबर मुंबईच्या आकर्षणापोटी फिरण्यासाठी आलेल्या नागरिकांचा समावेश असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अभियानादरम्यान मुंबई पोलिसांनी पकडलेल्या १३३६ भिक्षेकऱ्यांची चौकशी करण्याकरीता चेंबूर (मुंबई) येथील पुरुषांच्या भिक्षेकरीगृहात एकच पोलीस अधिकारी कार्यरत असल्याने स्वीकारगृहातील अधिकाऱ्यांना भिक्षेकऱ्यांची चौकशी करुन सर्व प्रक्रिया पूर्ण करुन मा.न्यायालयास त्याचा अहवाल सादर करणे गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पोलिसांनी आणलेली व्यक्ती भिक्षेकरी असल्याचे सिध्द करण्यासाठी ज्याप्रमाणे स्वीकारगृहातील अधिकारी त्यांचा अहवाल मा.न्यायालयास देतात, त्याप्रमाणे पोलिसांनी देखील त्याचा अहवाल मा.न्यायालयास दयावा त्यातून जास्तीत जास्त भिक्षेकऱ्यांना स्थानबध्द करता येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पोलीस अहवाल मा.न्यायालयास सादर करण्याचे दृष्टीने व भिक्षेकरीमुक्त अभियान प्रभावीपणे राबविण्याचे दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०६-०९-२०२१) :** (१) मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात माहे फेब्रुवारी, २०२० ते मे, २०२१ या कालावधीत एकूण २१७६ भिक्षेकरी व्यक्तींवर कार्यवाही करण्यात आली असून त्यापैकी १९०१ व्यक्ती भिक्षेकरी असल्याचे सिध्द झाले आहे. उर्वरित २७५ व्यक्ती भिक्षेकरी सिध्द न झाल्याने त्यांना मुक्त करण्यात आले आहे.

(२) मा.न्यायालयात भिक्षेकरी म्हणून सिध्द न झालेल्या २७५ व्यक्ती रस्त्याच्या कडेने जात असलेल्या इतर व्यक्ती असल्याचे निष्पन्न झाले आहे.

(३) भिक्षेकरी स्विकार केंद्रात दाखल झालेल्या भिक्षेकऱ्यांची चौकशी करुन सर्व प्रक्रिया पूर्ण करुन मा.न्यायालयात अहवाल सादर करण्याकरीता स्विकार केंद्रात परिविक्षा अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाते. पुरुष भिक्षेकरी स्विकार केंद्र, चेंबूर, मुंबई या संस्थेत भिक्षेकरी प्रवेशितांची चौकशी करण्यासाठी परिविक्षा अधिकारी या संवर्गाची ५ पदे मंजूर असून त्यापैकी २ पदे भरली आहेत. त्यापैकी एक पद विभागीय आयुक्त, महिला व बालविकास, कोकण विभाग, मुलुंड, मुंबई येथे वर्ग केलेले आहे.

(४) मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात भिक्षेकरीमुक्त मुंबई हे अभियान प्रभावीपणे राबविण्याकरीता सर्व पोलीस ठाण्यात विशेष पथक नेमण्यात आले आहे. सदर पथकातील अधिकारी व अंमलदार हे भिक्षेकरी ताब्यात घेतल्यानंतर त्यांचा अहवाल तयार करुन मा.न्यायालयास सादर करतात.

(५) मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात भिक्षेकरी पकड मोहिम प्रभावीपणे राबविण्याबाबत पोलीस सह आयुक्त, (कायदा व सुव्यवस्था) यांनी दिनांक ०९/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कार्यवाही करण्याबाबत सर्व पोलीस ठाण्यास आदेशित करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## ठाणे जिल्हयातील गावदेवी मैदानलगतच्या पत्रकार भवनात पत्रकारांसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३०) ८९६५ (१८-०६-२०२१) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील गावदेवी मैदानलगत असलेल्या पत्रकार भवनाच्या भव्य वास्तूमध्ये पत्रकारांसाठी जागा न देता ठेकेदाराने या वास्तूमधील गाळे परस्पर विक्री केल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात दैनिक पत्रकार संघ गत १० वर्षापासून पाठपुरावा करीत असून ठाणे जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष यांनी पत्रकार भवनाच्या भ्रष्टाचारा विषयीचे निवेदन मा.महसूल राज्यमंत्री यांना देवून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पत्रकार भवनातील गाळे परस्पर विक्री करणाऱ्या ठेकेदारावर कारवाई करुन पत्रकार भवनात पत्रकारांसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (१६-०९-२०२१)** : (१) व (२) मौजे ठाणे, ता.जि.ठाणे येथील टिका नं. २३ न.भू.क्र. ४३अ मधील ३००.०० चौ.मी. जागा शासन ज्ञापन दिनांक २०/०१/१९८८ व जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या दिनांक ०८/०२/१९८८ च्या आदेशान्वये ठाणे जिल्हा पत्रकार संघास पत्रकार भवन बांधण्याच्या प्रयोजनार्थ काही अटी व शर्तीवर विनामुल्य मंजूर करण्यात आली आहे.

ठाणे जिल्हा पत्रकार संघाचे कार्यकारी मंडळ व विश्वस्त यांनी सदर जमिनीवर पत्रकार भवन उभारण्याचे कंत्राट श्री.राजन बद्रीप्रसाद शर्मा यांना दिनांक २१/११/१९९१ च्या नोटराईज बांधकाम व विकास कराराने दिल्याचे दिसते.

पत्रकार संघाचे बांधकाम ठेकेदार श्री.राजन शर्मा यांनी पत्रकार भवनाचे खोटे दस्तऐवज बनवून शासकीय जमिनीचा कोट्यावधीचा गैरव्यवहार केलेप्रकरणी संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याबाबत अध्यक्ष, ठाणे जिल्हा पत्रकार संघ यांनी मा.राज्यमंत्री (महसूल) यांना दिनांक ०९/०४/२०२१ च्या निवेदनाद्वारे विनंती केली आहे.

(३) ठाणे जिल्हा पत्रकार संघास मंजूर करण्यात आलेल्या जमिनीसंदर्भात शर्तभंग आढळून आल्याने उप विभागीय अधिकारी, ठाणे यांनी दिनांक ३०/११/१९९९ रोजी सदर जमीन सरकार जमा करण्याचे आदेश पारीत केले आहेत. प्रस्तुत प्रकरणी सुरु करण्यात आलेल्या कारवाईविरुध्द श्री.राजन बद्रीप्रसाद शर्मा यांनी सह दिवाणी न्याधीश (वरिष्ठ स्तर), ठाणे यांच्या न्यायालयात नियमित दावा क्रमांक ४०१/१९९९ दाखल केला असून सदर दाव्यात मा.न्यायालयाने जैसे थे आदेश पारीत केलेले आहेत. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ सोयाबीनचे नवीन वाण विकसित करण्यास असमर्थ ठरल्याबाबत

**(३१) ९०११ (१४-०६-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी येथील वसंतराव नाईक कृषी विद्यापीठाने यावर्षी सोयाबीनचे १० वाण, राहूरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाने (जि.अहमदनगर) ९ वाण विकसित केले असताना, अकोला येथील पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने २ ते ३ प्रकारचे वाण विकसित केले असल्याचे तसेच उत्पन्नाचे तुरीचे वाण देखील विकसित करण्यात विद्यापीठ असमर्थ ठरले असल्याचे दिनांक ५ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने सोयाबीनच्या १००१ व्हरायटी वाणाचे प्रात्यक्षिक विद्यापीठ क्षेत्रातील किती ठिकाणी घेतले तसेच त्याचे एकरी उत्पन्न अत्यंत कमी दरात आले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कृषी विद्यापीठातील कृषी विषयक संशोधनासाठी शासन निधी वितरित करीत असूनही पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे सोयाबीन व तुरीचे वाण विकसित करण्यात असमर्थ ठरले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अकोला जिल्ह्यातील सोयाबीनची वाढीव मागणी, कपाशीवर येणारी बोंडअळी तसेच खताची साठेबाजी रोखण्यासाठी व मागील वर्षाप्रमाणे थेट बांधावर खते पोहोचविणे याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबत जिल्ह्यात उपक्रम राबवून आढावा घेण्यात आला आहे काय व केव्हा,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०२-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांनी सोयाबीन व तुर या दोन्ही पिकांचे सुधारित आणि हवामान अनुकूल असे उत्कृष्ट वाण विकसित केलेले आहेत. यामध्ये सोयाबीन पिकाचे ०६ वाण विकसित केलेले असून त्यापैकी ०३ वाण राष्ट्रीय पातळीवर अधिसुचित करण्यात आलेले आहेत. सदर वाण उत्पादनक्षम असून ते मुळकुज / खोडकुज या रोगास व चक्रभुंगा आणि खोडमाशी या किडीस मध्यम प्रतिकारक आहेत. याव्यतिरीक्त ०८ जनुक वाण मुळकुज रोगासाठी व ०३ जनुक वाण किड प्रतिकारक /सहनशिलतेचे स्त्रोत म्हणुन ओळखण्यात आले आहेत व देश पातळीवर सोयाबीन प्रजनन कार्यक्रमात प्रतिरोधक स्त्रोत म्हणुन वापरण्यात येत आहेत.

तसेच तुर या पिकाचे ०४ सुधारित वाण व ०२ संकरित वाण विकसित करण्यात आलेले आहेत. याव्यतिरीक्त ०२ वाण अंतिम चाचणी प्रयोगात असून राष्ट्रीय पातळीवर प्रसारित होण्याच्या मार्गावर आहेत.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात पोकरा व आत्मा योजनेंतर्गत पिकांची प्रात्यक्षिके घेण्याबाबत

**(३२) ९०१२ (१३-०७-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या पोकरा व आत्मा योजनेंतर्गत नवनवीन पिकांची प्रात्यक्षिके घेणे अपेक्षित असून उन्हाळी कांदा, काळा ऊस, भुईमुग, बटाटा व मसालावर्गीय पिके या पिकांसंदर्भात प्रात्यक्षिके घेण्याबाबत शेतकरी मागणी करीत असल्याचे दिनांक ५ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रात्यक्षिकाच्या शेतीशाळा घेताना कडधान्यांच्या शेतीशाळा घेऊन पारंपारिक पध्दतीची नाविण्यपूर्ण पिके उत्पादित होऊन त्यासाठी शेततळयाचे देखील प्रात्यक्षिक होणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२७-०८-२०२१) :** (१) नाही.

(२) लागू नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी शेतकऱ्यांना सर्व बियाणे उपलब्ध होण्यासाठी मध्यवर्ती केंद्र स्थापन करण्याबाबत

**(३३) ९०१३ (१३-०७-२०२१) श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी (जि.अहमदनगर) या कृषी विद्यापीठाने सर्व बियाणे एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावे म्हणून मध्यवर्ती केंद्र स्थापन करण्याची योजना अंमलात आणली असल्याचे दिनांक ५ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या धर्तीवर अकोला येथील पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने देखील जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाणी शेतकऱ्यांना एकाच ठिकाणी बियाणे उपलब्ध व्हावे म्हणून

मध्यवर्ती केंद्र स्थापन करावे अशी मागणी अकोला व वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेतकऱ्यांना एकाच ठिकाणी सर्व बियाणे उपलब्ध व्हावीत याकरीता अकोला जिल्ह्यातील ठिकाणी मध्यवर्ती केंद्र स्थापन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०२-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

महात्मा फुले कृषी विद्यापीठात उत्पादीत होणारे बियाणे आणि इतर उत्पादने विद्यापीठ कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना उपलब्ध होण्यासाठी विद्यापीठाने एकूण २७ विक्री केंद्रांची स्थापना केलेली आहे. त्यापैकी राहुरी येथील मध्यवर्ती परिसरातील विक्री केंद्र व इतर २६ विक्री केंद्राद्वारे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना बियाणे व इतर उत्पादने खरेदीसाठी उपलब्ध केलेली आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अंतर्गत मध्यवर्ती संशोधन केंद्र, अकोला व कृषी संशोधन केंद्र, वाशीम येथे शेतकऱ्यांना बियाणे उपलब्ध करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई येथील बेस्ट उपक्रमातील कर्मचाऱ्यांना कोरोना भत्ता विनाविलंब देण्याबाबत

**(३४) ९०४१ (११-०६-२०२१) श्री.निलय नाईक, डॉ.परिणय फुके, श्री.प्रवीण दटके, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, श्री.रामनिवास सिंह, श्री.प्रशांत परिचारक, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये कोरोना साथीच्या काळात सेवा देणाऱ्या बेस्ट उपक्रमाच्या कर्मचाऱ्यांना दररोज ३०० रुपये कोरोना भत्ता देण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोना साथीच्या काळात जिवावर उदार होऊन काम करणाऱ्या बेस्ट उपक्रमातील चालक, वाहकांसह विद्युत अभियंता इत्यादी विभागातील शेकडो कर्मचारी कोरोना भत्त्यापासून वंचित असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत वर्षी माहे मार्च, २०२० पासून टाळेबंदी लागू झाली असूनही बेस्ट उपक्रमातील परिवहन, विद्युत सह अन्य विभागातील अनेक कर्मचारी अत्यावश्यक सेवा देण्यासाठी उपस्थित राहूनही कर्मचाऱ्याना त्या कालावधीतील कोविड भत्ता अद्याप न मिळाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बेस्ट उपक्रमातील कर्मचाऱ्यांना कोरोना भत्ता विनाविलंब देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२२-०९-२०२१)** : (१) हे खरे आहे.

(२) व (३) बेस्ट उपक्रमातील संबंधित कर्मचाऱ्यांना दिनांक २३ मार्च, २०२० ते दिनांक २२ जून, २०२० या कालावधीपर्यंत कोरोना भत्त्याचे प्रदान करण्यात आले आहे.

तद्नंतर पुरेशा निधीअभावी सदर भत्त्याचे प्रदान करणे शक्य झाले नाही असे बेस्ट प्रशासनामार्फत कळविण्यात आले आहे.

(४) व (५) सद्य:स्थितीत बेस्ट उपक्रमाच्या स्त्रोतांवर मर्यादा आल्यामुळे पुरेशा निधीअभावी सदर अतिरिक्त भत्त्याचे प्रदान करणे शक्य झाले नाही. निधीच्या उपलब्धतेनुसार सदर भत्त्याचे प्रदान करण्यात येणार असल्याचे बेस्ट प्रशासनामार्फत कळविण्यात आले आहे.

---

## खारेगाव, कळवा (जि.ठाणे) येथील सफायर रुग्णालयाने पोलिसांकडून वैद्यकीय उपचाराचे देयक जबरदस्तीने वसूल केल्याबाबत

**(३५) ९०८० (१४-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोविड-१९ च्या विषाणूचा संसर्ग झालेल्या पोलीस अधिकारी, पोलीस व त्यांच्या कुटुंबियांना औषधोपचाराचा संपूर्ण खर्च पोलीस स्कीममधूनच देण्यासंबंधी राज्य शासनाचे आदेश असताना ठाणे जिल्हयातील कळवा खारेगाव येथे असलेल्या सफायर रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या वर्तकनगर पोलीस ठाणे येथील पोलीस अधिकारी व त्यांचे कुटुंब यांना पोलीस स्कीममध्ये न दाखवता त्यांच्या आजारपणाच्या खर्चाचे संपूर्ण बील रुग्णालयाचे संचालक यांनी जबरदस्तीने वसूल केल्याचा प्रकार माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरहू रुग्णालयाचे संचालक यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०३-०८-२०२१) :** (१) व (२) नाही.

तथापि, यासंदर्भात श्री.अब्दुल रहेमान शेख यांनी ठाणे शहर पोलीस दलातील वर्तक नगर पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक श्री.प्रताप येरुणकर यांच्यावतीने सफायर हॉस्पीटलचे संचालक यांच्याविरुध्द तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने चोकशी करण्यात आली. त्यानुसार वर्तकनगर पोलीस ठाणे येथील सहायक पोलीस निरीक्षक श्री.येरुणकर हे स्वतः व त्यांची मुलगी दिनांक २४/०७/२०२० रोजी व त्यांचा मुलगा व पत्नी दिनांक २८/०७/२०२० रोजी हे सर्वजण कोविड-१९ च्या उपचाराकरीता सफायर रुग्णालयात दाखल झाले. श्री.येरुणकर यांना व त्यांचे कुटुंबियांना रुग्णालयामध्ये सर्व सुखसुविधा मिळण्याकरीता तसेच स्वतंत्र रुम मिळण्याकरीता त्यांनी ओरियंटल इन्श्युरन्स कंपनीचे मेडिक्लेमबाबतची कागदपत्रे रुग्णालयात जमा केली होती. त्यानुसार श्री.येरुणकर यांच्या पत्नी,

मुलगा व मुलगी यांना दिनांक ०६/०८/२०२० रोजी हॉस्पीटलमधून डिस्चार्ज दिला. तथापि, श्री.येरुणकर यांची प्रकृती गंभीर असल्याने ते आय.सी.यु.वॉर्डात ॲडमीट असल्याने त्यांना डिस्चार्ज दिला नव्हता.हॉस्पीटल प्रशासनाने श्री.येरुणकर यांच्या पत्नी, मुलगा व मुलगी यांच्या बिलाची रक्कम एकूण रुपये ४,२७,७६५/- चे बिल ओरियंटल इन्श्युरन्स कंपनीला पाठवली. तथापि, श्री.येरुणकर यांना दिनांक १८/०८/२०२० रोजी डिस्चार्ज दिला त्यावेळी त्यांच्यावर झालेल्या उपचाराच्या बिलाची रक्कम रुपये ५,४१,६६१/- इतकी होती. त्यादरम्यान श्री.येरुणकर यांच्या मुलाने त्यांचा मेडीक्लेम संपत असल्याचे लक्षात आल्यावर त्यांच्या वडीलांच्या बिलाचा सर्व खर्च मुंबई पोलीस योजनेमधून करण्यासाठी हॉस्पीटल प्रशासनाला सांगितले.

महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेंतर्गत उपचार घ्यावयाचा असेल तर आंतररुग्ण झाल्यानंतर २४ तासाच्या आत किंवा जास्तीत जास्त ०७ दिवसापर्यंत सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे. तथापि, श्री.येरुणकर यांच्या प्रकरणी महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेंतर्गत हॉस्पीटल प्रशासनास आवश्यक कागदपत्रे सादर केले नसल्याने त्यांचे व त्यांच्या कुटुंबियांचे उपचार महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेंतर्गत केले नाहीत.

एकंदरीत श्री.येरुणकर यांचे व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांच्या ०४ देयकांची पडताळणी केली असता, एकूण बिलाच्या रक्कमेपैकी रुपये २,२८,८७०/- रक्कम त्यांनी भरलेली नाही. तसेच त्यांच्या बिलामध्ये जादा आकारण्यात आलेली रुपये ५६,९७२/- इतकी रक्कम वजा केली. तथापि, उर्वरित बिलाची रक्कमही त्यांनी अद्याप भरलेली नाही. सदरची रक्कम हॉस्पीटलकडून त्यांना सोडून दिल्याचे लेखी कळविले आहे. त्यामुळे या विषयीचा प्राप्त तक्रार अर्ज निकाली काढण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यातील महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २५८ अंतर्गत प्रकरणे निकाली काढण्याबाबत

**(३६) ९१३३ (१५-०७-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात मागील ५ वर्षात अधीक्षक भूमि अभिलेख, भूमि अभिलेख, हिंगोली आणि उपअधीक्षक भूमि अभिलेख, हिंगोली तालुका यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २५८ अंतर्गत एकही प्रकरण निकाली काढले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करुन हिंगोली जिल्ह्यातील महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २५८ अंतर्गत प्रकरणे निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (०४-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, हिंगोली यांचे कार्यालयाकडून मागील ५ वर्षामध्ये ३७ प्रकरणामध्ये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २५८ अंतर्गत त्यांच्या अधिनस्त उप अधीक्षक भूमि अभिलेख यांना पुनर्विलोकनाची परवानगी देण्यात आली आहे.

तदनुसार, उप अधीक्षक भूमि अभिलेख, हिंगोली व उप अधीक्षक भूमि अभिलेख, सेनगांव यांचेकडे अनुक्रमे ३६ व १ असे एकूण ३७ प्रकरणे वर्ग करण्यात आली असून, त्यापैकी उप अधीक्षक भूमि अभिलेख, हिंगोली व उप अधीक्षक भूमि अभिलेख, सेनगांव यांचे कार्यालयाकडून अनुक्रमे ३० व १ असे एकूण ३१ प्रकरणे अंतिमरित्या निकाली काढण्यात आली आहेत. उप अधीक्षक भूमि अभिलेख, हिंगोली या कार्यालयाकडील उर्वरित ६ प्रकरणे अंतिम निकाली काढण्यासाठी प्रलंबित आहेत. त्याबाबत जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, हिंगोली व उप अधीक्षक भूमि अभिलेख, हिंगोली यांना सदरहू प्रलंबित प्रकरणे त्वरेने निकाली काढण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पत्रकारांना व कॅमेरामन यांना 'फ्रंटलाईन वर्कर' म्हणून मान्यता मिळण्याबाबत

**(३७) ९१६५ (११-०६-२०२१) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात लसीकरण सुरू झाल्यापासून मराठी पत्रकार परिषदेच्या नेतृत्वाखाली पत्रकारांना व कॅमेरामन यांना 'फ्रंटलाईन वर्कर' म्हणून मान्यता द्या अशी मागणी करुनही शासनाने त्यांच्या मागण्या व आंदोलनाची दखल न घेतल्याने, राज्यात दिनांक १० मे, २०२१ पर्यंत २३५ हून अधिक पत्रकारांचा कोरोनाने मृत्यू झाला असून राज्यात कोरोनाबाधित पत्रकारांची संख्या ५००० पर्यंत पोहचलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशातील १२ राज्यांनी पत्रकारांना व कॅमेरामन यांना कोरोनायोध्दा म्हणून मान्यता दिली असताना सुध्दा राज्यातील पत्रकारांना फ्रन्टलाईन वर्कर म्हणून मान्यता न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) तसेच मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी कोरोनाने पत्रकाराचे निधन झाल्यास त्यांना ५० लाख रुपये देण्याची घोषणा केली असूनही आजमितीस त्याची पूर्तता झाली नसल्याने केंद्र व अन्य राज्याच्या धर्तीवर राज्यातील कोरोनाने मृत्यू झालेल्या २३५ पत्रकारांच्या कुंटुंबियांना किमान ५ लाख रूपये आर्थिक मदत करण्याबाबतच्या मागणीकरीता गत ४ महिन्यापासून सातत्याने पाठपुरावा करुनही शासनाचे याकडे दुर्लक्ष झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील सर्व आरोग्य कर्मचारी, पोलीस कर्मचारी, आरोग्य सेवक आदींना प्राधान्याने कोरोना प्रतिबंधक लस दिली जात आहे त्याच पध्दतीने राज्यातील पत्रकारांना आघाडीवरील कर्मचाऱ्याचा दर्जा देऊन तात्काळ लस देण्यात यावी, अशी मागणी मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पत्रकारांच्या सदरहू मागण्याबाबत आजमितीस ठोस निर्णय न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पत्रकारांना व कॅमेरामन यांना “फ्रंटलाईन वर्कर” म्हणून विनाविलंब प्राधान्याने कोरोना रोग प्रतिबंधक लस देण्याच्या दृष्टीने तसेच मृत पत्रकारांच्या कुंटुंबियांना किमान ५ लाख रूपये आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (०५-१०-२०२१) :** (१) पत्रकार व कॅमेरामन यांना फ्रन्टलाईन वर्कर म्हणून मान्यता द्या अशी मागणीचे नव्हे तर राज्यातील पत्रकार व कॅमेरामॅन यांना तसेच त्यांच्या कुटुंबियांना लसिकरणामध्ये प्राधान्य देण्यात यावे अशा प्रकारच्या मागण्या विविध पत्रकार संघटना व पत्रकारांकडून निवेदनाद्वारे शासनास करण्यात आल्या होत्या.

राज्यात कोरोनामुळे नेमक्या किती पत्रकरांचा मृत्यू झाला तसेच किती पत्रकार कोरोनाबाधित झाले यांची आकडेवारी उपलब्ध नसल्याने याप्रकरणी भाष्य करणे उचित ठरणार नाही.

(२) देशातील १२ राज्यांनी पत्रकारांना व कॅमेरामन यांना कोरोना योध्दा म्हणून मान्यता दिल्याचा संदर्भ आढळून आला नाही.

(३) कोरोनाच्या सार्वत्रिक साथीमध्ये सर्वेक्षण, शोध, माग काढणे, प्रतिबंध, चाचणी, उपचार व मदत कार्य यांचेशी संबंधित कर्तव्य बजावित असताना शासनाच्या विविध विभागातील विविध प्रवर्गातील कर्मचारी यांचा कोरोना विषाणूशी जवळून संबध येतो अशा कर्मचाऱ्यांना रुपये ५० लक्ष रकमेचे सर्वकक्ष वैयक्तिक अपघात विमा कवच पुरविण्याबाबत दिनांक २९ मे, २०२० रोजी वित्त विभागामार्फत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. पत्रकारांचा कोरोना विषाणूशी जवळून संबंध येत नाही यास्तव त्यांना आर्थिक मदत देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(४) होय.

(५) लसीकरण करण्यासंदर्भात प्राधान्यक्रम निश्चित करताना फ्रन्ट लाईन वर्कर म्हणून केंद्र शासनाकडून प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आलेले आहे. त्यामध्ये राज्य केंद्र शासनाचे पोलीस विभाग, सशस्त्र सैन्य, होमगार्ड, तुरुंग कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन स्वयंसेवक, महानगरपालिकेतील कर्मचारी, कोविड-१९ च्या प्रतिबंधासाठी कार्यरत असलेले महसूल कर्मचारी वर्ग, नागरी संरक्षण दल इत्यादीचा समावेश फ्रन्ट लाईन वर्कर म्हणून करण्यात आला असून त्यात पत्रकारतेमध्ये कार्यरत असलेल्याचा समावेश नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अंबाजोगाई नगरपरिषदेत कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३८) ९१८९ (११-०६-२०२१) श्री.विनायकराव मेटे : तारांकित प्रश्न क्रमांक ८००७ ला दिनांक १० मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई नगरपरिषदेत ४७०० रुपयांची खुर्ची रुपये १९ हजार ९०० इतक्या रक्कमेने खरेदी करण्यात आली असून आद्‌यकवी मुकुंदराज सभागृह नुतनीकरणावर कोट्यवधी रुपयांचा खर्च झाल्याची तक्रार जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्यामार्फत चौकशी सुरु असून जिल्हाधिकारी, बीड यांनी आपला अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अहवालाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाची व नगरपरिषदेची कोट्यवधी रुपयांची फसवणूक करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२९-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्याकडे सद्य:स्थितीत असणाऱ्या कामकाजाचे स्वरुप पहाता, जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक ०६/०९/२०२१ रोजीच्या आदेशान्वये अतिरिक्त अधिकाऱ्यांसह चौकशी समिती पुनर्गठीत केली आहे. सदर समितीने अद्याप अंतिम अहवाल सादर केलेला नाही.

---

## राज्यात विशेषत: उस्मानाबाद जिल्ह्यात व मंठा (जि.जालना) तालुक्यात शेतीसाठी लागणाऱ्या साहित्यांच्या किंमती नियंत्रणात ठेवण्याबाबत

**(३९) ९२३३ (१८-०६-२०२१) श्री.विप्लव बाजोरिया, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: उस्मानाबाद जिल्हयात व मंठा (जि.जालना) तालुक्यात शेतीसाठी लागणारे बि-बियाणे, रासायनिक खत, किटकनाशके इ. साहित्यांचा काळाबाजार होवून दरवाढ झाल्याने शेतकऱ्यांना आर्थिक भार सोसावा लागत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गतवर्षी डीएपी चा दर रुपये १२५० ते रुपये १२६५ प्रति पोते इतका होता यामध्ये यावर्षी वाढ होवून हा दर रुपये १५०० पर्यंत पोहोचला असून लॉकडाऊननंतर डीएपी चा दर रुपये १९०० प्रति पोते या दराने होणार असल्याने दुकानदार व डिलर्स यांनी जुन्या खताची साठवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रासायनिक खतांवर शासनाने अनुदान द्यावे अशी मागणी शेतकऱ्यांनी मा.कृषी मंत्री, आयुक्त, कृषी, प्रधान सचिव, कृषी व पशुसंवर्धन विभाग यांचेकडे दिनांक १७ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली असून

रासायनिक खतांचा पुरवठा होत नसल्याने शेतकऱ्यांना खत मिळण्यास प्रतिक्षा करावी लागत आहे, वेळेत खतांचा पुरवठा होत नसल्याने शेतीचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बि-बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके इ. साहित्यांचा काळाबाजार होऊ नये तसेच कोरोना महामारी, लॉकडाऊन, अवकाळी पाऊस व इतर नैसर्गिक आपत्तीमुळे आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यास शेती उपयोगी बि-बियाणे, रासायनिक खते व किटकनाशके इ. साहित्य पूर्वीच्या दरात उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेती उपयोगी साहित्यांचे योग्य दर निश्चित करुन रासायनिक खतांच्या किंमती नियंत्रणात ठेवण्यासह रासायनिक खतांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१०-०८-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) केंद्र शासनाने दिनांक २०/०५/२०२१ च्या ज्ञापनान्वये स्फुरदयुक्त खताच्या अनुदानामध्ये वाढ केल्याने डीएपीचे दर रुपये १२००/- प्रति बॅग असून त्यानुसार शेतकऱ्यांना आवश्यकतेप्रमाणे खत विक्री होत आहे. राज्यामध्ये खरीप हंगामासाठी माहे एप्रिल ते सप्टेंबर, २०२१ या कालावधीसाठी ४२.५० लाख मे.टन रासायनिक खतांचा साठा मंजूर झाला आहे. त्यामुळे खताअभावी शेतीचे नुकसान होण्याची शक्यता नाही. तसेच, बि-बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके यांच्या गुणवत्ता नियंत्रणासाठी भरारी पथक नियुक्त करण्यात आले असून, दोषी विक्रेत्यांविरुध्द कारवाई करण्यात आली आहे. तसेच, जिल्ह्यातील सर्व खत परवानाधारकास दर्शनी भागात खताच्या साठ्याची व दराची फलकावर अद्यावत नोंदी घेणे तसेच तक्रार निवारण क्रमांक दर्शनी भागात दाखविणेसाठी बंधनकारक केले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड पोलिसांवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(४०) ९२६९ (१४-०६-२०२१) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड, श्री.अरुण लाड, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर कोणतेही धार्मिक सण, सांस्कृतिक कार्यक्रम व अन्य जाहीर कार्यक्रमांवर बंदी घातली असताना दिनांक २९ मार्च, २०२१ रोजी नांदेड येथे गुरुद्वारा बोर्डाच्यावतीने होळी व मोहल्ला हल्ला निमित्त मिरवणूक काढण्यात येवून पोलिसांनी त्यास परवानगी नाकारल्याच्या रागातून पोलिसांनी लावलेल्या बॅरिकेड्स तोडून बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांवरच तलवारीने व दगडफेक करुन हल्ला केल्याचे तसेच पोलिसांची वाहने जाळण्यात आल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर हल्ल्यात पोलीस अधीक्षकांसह अन्य १० पोलीस अधिकारी गंभीररित्या जखमी झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात करण्यात आलेल्या पोलीस कारवाईनुसार किती जणांवर गुन्हा नोंदविण्यात आला असून आतापर्यंत किती जणांना अटक करण्यात आली आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पोलिसांवर हल्ले करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०२-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर हल्ल्यामध्ये दोन पोलीस अधिकारी व दहा पोलीस अंमलदार जखमी झाले आहेत. त्यातील दोन पोलीस अंमलदारांवर तलवारीने हल्ला केल्यामुळे ते गंभीर जखमी झाले आहेत.

(३) व (४) श्री.हुजूर सचखंड गुरुद्वारा, नांदेड व देना बँक चौक, (गुरुद्वारा चौक), नांदेड येथे घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन वजिराबाद नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यामध्ये २४ आरोपींना अटक केली असून त्यामध्ये ३ विधी संघर्षित बालक यांचा समावेश आहे. उर्वरित आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास सुरु आहे.

देना बँक चौक, (गुरुद्वारा चौक), नांदेड येथे घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने सदर गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्ह्यामध्ये १ विधी संघर्षित बालक यांचा समावेश असून इतर फरार आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. सदर गुन्ह्याचा अधिक तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरातील नारा जैव विविधता उद्यान निर्मितीच्या कामांमध्ये स्थानिक रोजगारांना प्राधान्य देण्याबाबत

**(४१) ९३२७ (१५-०७-२०२१) श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील नारा जैव विविधता उद्यानामुळे शहरालगत निसर्ग भ्रमंतीची संधी नागपूरकरांना प्राप्त होणार असून प्रस्तावीत उद्यान निर्मितीच्या कामामध्ये स्थानिक रोजगारांना विशेष प्राधान्य देण्यात यावे, अशी सूचना मा.पालकमंत्री, नागपूर यांनी माहे एप्रिल, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार स्थानिकांना रोजगार देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उध्दव ठाकरे (३०-०९-२०२१) :** (१) होय हे खरे आहे.
(२) नगरपालिका असलेल्या शहरांमध्ये लोकांच्या सहभागाने आणि वन विभागांच्या सहकार्याने नव्याने भर देऊन शहरी जैव विविधतेचे जतन करण्यासाठी देशभरात नगर वन योजना राबविण्यात येत आहे. सन २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीत देशभरात २०० नगर वन विकसित करण्याचा केंद्र सरकारचा विचार असून नागपूर वन विभागातंर्गत सेमिनरी हिल्स वनपरिक्षेत्रातील नारा येथे १५.०० हे. क्षेत्रात नगर वन उद्यान मंजूर करण्यात आले आहे.

सदर प्रकल्पाचे काम प्राथमिक टप्प्यात असून प्रथमत: रोपवन करणे, रोपवन सभोवताल फेन्सिंग करणे, उद्यान सभोवताल संरक्षण भिंत बांधणे, उद्यानाकरीता विशेष गट तयार करणे इत्यादी कामे करण्यात येणार आहेत. उद्यानामध्ये जे रोजगार उपलब्ध होणारे आहेत त्यामध्ये स्थानिक लोकांना प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे.
(३) सदर प्रकल्पाचे काम प्राथमिक टप्प्यात असून उद्यानाचे कामे पूर्ण झाल्यानंतर स्थानिक लोकांना प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे.

---

## मुंबईतील डोंगरी येथील खाजगी रुग्णालयाने रुग्णाची आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(४२) ९३६० (१४-०६-२०२१) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील नागपाडा येथील ७४ वर्षीय व्यक्ती कोरोना बाधित नसतानाही डोंगरी येथील खाजगी रुग्णालयाने सदर रुग्णास रुपये ४८ हजारांची रेमेडीसीवीर व अन्य औषधे, अतिदक्षता विभाग आणि सेवकांचे ५० हजार दर लावून मृतदेह बंदिस्त करुन देण्याचे रुपये ४५०० आकारण्यात येऊन फसवणूक केल्याची तक्रार दिनांक १ ऑक्टोबर, २०२० रोजी डोंगरी पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रुग्णालय व्यवस्थापनाने किती रुपये उपचार शुल्क आकारुन रुग्णांची आर्थिक फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे, त्यानुसार पोलिसांनी रुग्णालयाने आकारलेली अतिरिक्त रक्कम रुग्णांच्या कुटुंबियांना परत करुन रुग्णालय व्यवस्थापनाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (२५-०८-२०२१) :** (१) व (२) याबाबत रुग्णाच्या मुलाने त्यांच्या वडीलांचे कॉज ऑफ डेथ चुकीचे दिले व बिल जास्त आकारले म्हणून हबीब रुग्णालयाविरुध्द डोंगरी पोलीस ठाणे येथे दिनांक १४/०९/२०२० रोजी तक्रार अर्ज दाखल केला होता.

त्याअनुषंगाने चौकशी केली असता, तक्रारदार यांनी त्यांच्या वडीलांचा कोविड १९ चा रिपोर्ट मेट्रोपोलीस लॅबने निगेटिव्ह व थायरोकेअर लॅबने पॉझिटीव्ह असे रिपोर्ट दिनांक ०४/०९/२०२० रोजी हबीब हॉस्पीटल, डोंगरी, मुंबई येथे सादर केल्यानंतर त्यांचेवर प्रथम निगेटीव्ह रिपोर्ट विचारात घेऊन त्यांना कोविडचा औषधोपचार करता येणार नसल्याचे सांगितले. मात्र तक्रारदाराने पॉझिटीव्ह रिपोर्ट निदर्शनास आणल्यानंतर रुग्णावर कोविड-१९ पॉझीटीव्ह आजाराचे उपचार करुन हॉस्पीटल प्रशासनाने त्यांच्या वडीलांच्या उपचाराकरीता रुपये २,६४,०००/- एवढे देयक आकारले होते. परंतु तक्रारदार यांनी हॉस्पीटल प्रशासनास विनंती केल्यानंतर हबीब हॉस्पीटल प्रशासनाकडून देयक कमी करुन रुपये १,२८,०००/- इतके कमी करण्यात आले आहे.

तक्रारदार यांचे जबाब नोंद केले असता, तक्रारदार यांच्या वडीलांचे कोविड-१९ रिपोर्ट मेट्रोपोलीस लॅबने निगेटिव्ह व थायरोकेअर लॅबने पॉझिटीव्ह असे वेगवेगळे दिल्यामुळे संभ्रम निर्माण झाला होता. तक्रारदार हे त्यांच्या वडीलांचे कोरोना रिपोर्ट परत संबंधित लॅबकडून मागवून घेणार आहेत व रिपोर्ट आल्यानंतर जर त्यांना याबाबत तक्रार दाखल करावयाची असल्यास ते पत्रव्यवहार करणार असल्याबाबत त्यांनी जबाबात नमूद केले आहे. पोलीस ठाणेस दिलेला सदरचा तक्रार अर्ज दप्तरी दाखल करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे. तद्नंतर अद्यापपर्यंत तक्रारदार यांनी सदर हबीब रुग्णालयासंदर्भात डोंगरी पोलीस ठाणेस कोणतीही तक्रार सादर केलेली नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई पोलीस दलातील सेवानिवृत्त झालेल्यांना सेवानिवृत्तीवेतन व सेवानिवृत्तीनंतरचा लाभ देण्याबाबत

**(४३) ९५८६ (१३-०७-२०२१) श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार : तारांकित प्रश्न क्रमांक ७९९७ ला दिनांक ९ मार्च, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ डिसेंबर, २०१९ पासून आजमितीस (दिनांक ३१ मार्च, २०२१ अखेरपर्यंत) बहन्मुंबई पोलीस आयुक्ताच्या अखत्यारीतील तसेच रेल्वे पोलीस विभागातून निवृत्त झालेल्या पोलीस शिपाई, पोलीस हवालदार, जमादार तसेच पोलीस उपनिरीक्षकांना सातव्या वेतन आयोगानुसार थकबाकीची रक्कम व सेवानिवृत्त वेतन, तसेच सेवानिवृत्तीनंतर मिळणारी डेथ-कम रिटायर्डमेंट ग्रज्युइटी शिल्लक अर्जित रजेच्या ऐवजीचे वेतन निधीत जमा असलेली रक्कम यापैकी कोणतीही रक्कम सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यांना अदा करण्यात आली नाही, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सातव्या वेतन आयोगाची प्रकरणे प्रलंबित असल्याच्या तक्रारी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सातत्याने केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेवानिवृत्त झाल्यानंतर लगेच तात्पुरती पेन्शन सुरु होते व जी केवळ १ वर्षासाठी असून २०२० मधील पहिल्या तिमाहीत निवृत्त झालेल्या असंख्य पोलिसांची तात्पुरती पेन्शनही आता बंद झाली असून दिनांक १ डिसेंबर, २०१९ पासून दिनांक ३१ मार्च, २०२१ अखेरपर्यंत एकूण किती पोलीस कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून किती पोलीस कर्मचाऱ्यांना आजमितीस सेवानिवृत्त वेतन व अन्य देय असलेली रक्कम अदा करणे बाकी आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पोलीस अधिकारी/ कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगानुसार थकबाकी व सेवानिवृत्त वेतन तसेच अन्य देय असलेली रक्कम अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०८-१०-२०२१) :** (१) हे खरे नाही

माहे १ डिसेंबर, २०१९ पासून माहे ३१ मार्च, २०२१ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या सर्व पोलीस कर्मचाऱ्यांना तात्पुरते निवृत्तीवेतन अदा करण्यात आलेले आहे. ज्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकाची पडताळणी झाली आहे अशा कर्मचाऱ्यांना सेवा उपदान, शिल्लक रजेचे वेतन, भविष्य निर्वाह निधीत जमा असलेली रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे लॉकडाऊनच्या काळात कमी उपस्थितीमुळे वेतन पडताळणी पथकास सादर केलेल्या सेवापुस्तकांची पडताळणी प्रलंबित असल्यामुळे सेवानिवृत्त झालेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगानुसार सेवानिवृत्ती वेतन व अनुषंगिक बाबी अदा करण्यास आणखी काही कालावधी लागणार आहे. सद्य:स्थितीत शासकीय कार्यालयांतील उपस्थिती वाढविली असल्याने प्रलंबित प्रकरणे बऱ्याच प्रमाणात निकाली काढण्यात आली आहेत.

(३) कोविड-१९ विषाणूच्या प्रादुर्भावामुळे शासकीय कार्यालयांतील कर्मचाऱ्यांची उपस्थिती ५%, २०% व ५०% नियमित करण्यात आलेली असल्याने वेतन पडताळणी पथकाकडे सादर केलेल्या सेवापुस्तकांची पडताळणी न झाल्याने तसेच महालेखापाल कार्यालयास सादर केलेली प्रकरणे मंजूर न झाल्यामुळे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतरचा लाभ मिळण्यास विलंब झाला ही वस्तूस्थिती आहे.

माहे १ डिसेंबर, २०१९ ते ३१ मार्च, २०२१ या कालावधीत पोलीस आयुक्त कार्यालयाच्या आस्थपनेवरून एकूण १८२६ कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून त्यापैकी ६८१ कर्मचाऱ्यांना अंतिम निवृत्तीवेतन मंजूर करण्यात आले असून एकूण ११४४ कर्मचाऱ्यांना तात्पुरते निवृत्तीवेतन मंजूर करण्यात आले आहे. अद्याप ७०५ कर्मचाऱ्यांना शिल्लक अर्जित रजा सममूल्य वेतनाचे लाभ तसेच १२०९ कर्मचाऱ्यांना सेवा-नि-उपदानाचे लाभ हे त्यांची सेवापुस्तकांच्या पडताळणीअभावी प्रमाणित न झाल्यामुळे प्रलंबित राहिली आहेत.

(४) शासन निर्णय दिनांक २५/११/२०२० अन्वये पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयाच्या स्तरावर दोन वेतनपडताळणी पथकांची स्थापना करण्यात आली असून सदर पथकांना दिनांक ३१/१२/२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. दिनांक २३/०८/२०२१ पर्यंत ३९२८ सेवापुस्तकांची पडताळणी पूर्ण झाली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यात युरिया खताचा काळाबाजार होत असल्याबाबत

**(४४) ९७०९ (२१-०६-२०२१) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यासाठी राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर (आरसीएफ) कंपनीकडून पुरवठा करण्यात येत असलेल्या अनुदानित युरिया खताच्या १५ हजार टन युरियापैकी प्रत्यक्षात केवळ १ ते २ हजार टन इतकाच युरिया खताचा पुरवठा होत असल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांनी दिनांक ४ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकूण प्राप्त युरियाचा डहाणू तालुक्यात सर्रासपणे कोट्यवधी रुपयांचा काळाबाजार करण्यात येत असून रुपये ३०० ला मिळणारी युरिया खताची गोणी रुपये १६०० ला बोईसर येथील औद्योगिक कारखान्यांना विकण्यात येत असल्याच्या तक्रारी शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना युरिया खत मिळण्याऐवजी त्याचा काळाबाजार करणाऱ्यांविरुध्द कारवाई करुन शेतकऱ्यांनी केलेल्या मागणीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०६-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

(३) पालघर जिल्ह्यामध्ये सन २०२०-२१ मध्ये १७१५७ मे.टन इतका युरिया खताचा पुरवठा मे.राष्ट्रीय केमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर लि. मुंबई यांचेकडून झालेला आहे. वर्तमान पत्रातील बातम्यांच्या अनुषंगाने, पालघर जिल्ह्यातील जास्तीत जास्त खत विक्री करणाऱ्या कृषी सेवा केंद्रांची व वारंवार खरेदी करणाऱ्या खरेदीदारांची चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीमध्ये युरिया शेतकऱ्यांनीच वापरला असल्याचे निदर्शनास आले आहे. पालघर जिल्हा दुर्गम भाग आहे त्यामुळे बऱ्याच वेळा इंटरनेटची सुविधा त्याठिकाणी विस्कळीत असते. त्यामुळे हंगामात गर्दीच्या वेळी ऑफलाईन विक्री POS मशीन व प्रत्यक्ष साठा यांचा ताळमेळ दिसून येत नाही. तथापि, संपूर्ण हंगामामध्ये कुठेही युरिया खत मिळत नसल्याची तक्रार प्राप्त नाही. तसेच, पालघर जिल्ह्यात युरिया ज्यादा दराने विक्री झाल्याचे आढळून आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पंचायत समिती आष्टी (जि.बीड) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरींवरील स्थगिती उठविण्याबाबत

**(४५) ९८२५ (१५-०७-२०२१) श्री.सुरेश धस** : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती आष्टी (जि.बीड) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०१६-२०१७ मध्ये ८३० सिंचन विहिरींना देण्यात आलेल्या मंजूरी आदेशाला शासनस्तरावरुन स्थगिती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे सदरहू स्थगिती सहा महिन्यानंतर उठत असतानाही अद्यापही स्थगिती उठवण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सदर स्थगिती उठविण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने लाभार्थ्यांना न्याय देण्यासाठी सदरील ८३० सिंचन विहिरींवरील स्थगिती उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (०७-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

मा.विधान परिषद सदस्य श्री.सुरेश धस यांनी दिनांक १९/६/२०१९ च्या पत्रान्वये केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने, आष्टी तालुक्यातील सन २०१६-१७ व सन २०१७-१८ या कालावधीतील अकरा कलमी कार्यक्रमांतर्गत ८०० जलसिंचन विहिरींच्या मंजूरीमध्ये अनियमितता झाली किंवा कसे याबाबत अहवाल प्राप्त होईपर्यंत सदर विहिरींच्या कामांना स्थगिती देण्यात आली होती.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) प्रस्तावित सिंचन विहिरींचे प्रस्ताव रद्द करुन सद्य:स्थितीत प्रचलित असलेल्या Secure soft पध्दतीद्वारे उपरोक्त सिंचन विहिरींबाबत नव्याने प्रस्ताव मागवून नियमानुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, बीड यांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात इनाम व वतन (महार वतन व देवस्थान वगळून) या जमिनीवरील अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्याबाबत

**(४६) ९८९० (१५-०७-२०२१) श्री.नरेंद्र दराडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन अविभाज्य शर्तीने दिलेल्या इनाम व वतन (महार वतन व देवस्थान वगळून) या जमिनीवरील दिनांक १ जानेवारी, २०२१ पूर्वी सर्व अनधिकृत बांधकामे ७५ ऐवजी २५ टक्के दंड आकारुन नियमित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त जमिनी राज्यातील कोणकोणत्या जिल्ह्यातील आहेत व या जमिनीवरील किती अनधिकृत बांधकाम अधिकृत होणार आहेत,

(३) असल्यास, सदरहू शासन निर्णयाची अंमलबजावणी झाली आहे काय, कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात (२५-०८-२०२१) :** (१), (२), (३) व (४) नवीन अविभाज्य शर्थीने दिलेल्या इनाम / वतन (महार वतन व देवस्थान जमीन वगळून) जमिनी ज्या भोगवटादार वर्ग-२ च्या आहेत अशा जमिनींचे अकृषिक कारणास्तव झालेली बांधकामे गुंठेवारी कायद्यांतर्गत नियमित करण्याच्या अनुषंगाने, मुंबई परगणा व कुलकर्णी वतने नाहीशी करण्याबाबतचा अधिनियम १९५०, मुंबई (समाजास उपयुक्त) सेवा इनामे रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५३, मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत अधिनियम, १९५५, मुंबई गावची कनिष्ठ वतने नाहिशी करण्याबाबत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र मुलकी पाटील (पद रद्द करणे) अधिनियम १९६२ यांमध्ये सुधारणा करण्याकरीता विधेयक क्र.९ विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशन, २०२१ मध्ये दिनांक ५ जुलै, २०२१ रोजी मांडण्यात आले होते. सदर विधयेकास विधानमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर, त्याचे सन २०२१ चा अधिनियम क्र.१० मध्ये रुपांतरण करण्यात आलेले आहे. सदर अधिनियम क्र.१० मराठीमध्ये असाधारण राजपत्र भाग चार मध्ये दिनांक १६ जुलै, २०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

त्यानुसार, सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेने शिवाय ज्या इनाम / वतन जमिनी कृषीतर वापराच्या प्रयोजनासाठी अगोदरच हस्तांतरीत झालेल्या आहेत. तसेच, या जमिनींवरील बांधकामे गुंठेवारी अधिनियमान्वये नियमानुकूल केलेली आहेत, अशा बांधकामाखालील इनाम / वतन जमिनींच्या बाबतीतील सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेशिवाय झालेले हस्तांतरण संबंधित जमिनीच्या प्रचलित बाजारमूल्याच्या २५% रक्कम प्रदान केल्यावर नियमाधीन करता येईल आणि अशी रक्कम प्रदान केल्यावर, संबंधित जमीनधारक अशी जमीन भोगवटादार वर्ग-१ म्हणून धारण करील अशा आशयाची तरतूद करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्हयातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाचे अनुदान देण्याबाबत

**(४७) ९९२५ (१३-०७-२०२१) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रसाद लाड, डॉ.रणजित पाटील** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात मुख्यमंत्री सिंचन योजनेंतर्गत रखडलेले अनुदान देण्यात यावे अशी मागणी शेतकऱ्यांनी मा.मुख्यमंत्री, मा.कृषी मंत्री, प्रधान सचिव, कृषी विभाग यांना निवेदनाद्वारे केल्याचे माहे एप्रिल, २०२१ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१९-२०२० या वर्षातील मुख्यमंत्री सिंचन योजनेंतर्गत ३० टक्के अनुदान मिळाले नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन यवतमाळ जिल्हयातील शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाचे अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (२५-०८-२०२१) :** (१) मा.मुख्यमंत्री सचिवालय, मा.मंत्री (कृषी) यांचे कार्यालय व कृषी विभागात शेतकऱ्यांचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२), (३) व (४) सन २०१९-२० या वर्षात, यवतमाळ जिल्हयात, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत ६७९४ लाभार्थ्यांना रुपये ११.१७ कोटी निधीचे वाटप करण्यात आले आहे.

कोविड - १९ या संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर उद्‌भलेल्या आर्थिक परिस्थितीमुळे मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेच्या अंमलबजावणीसाठी निधी उपलब्ध होऊ शकला नाही. त्यामुळे सदर योजनेंतर्गत सुक्ष्म सिंचनासाठी पूरक अनुदानाच्या रकमेचे वाटप करण्यात आले नाही. निधी उपलब्धतेसाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## नवापाडा, डोंबिवली (प) येथील त्रिमूर्ती इंटरप्रायजेस या विकासकावर कारवाई करण्याबाबत

**(४८) १००२८ (१८-०६-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवापाडा, डोंबिवली (प) स्थित भागुबाई या पागडी स्वरूपाच्या इमारतीचा विकास करण्यासाठी त्रिमूर्ती इंटरप्रायजेस या विकासकाने सदर इमारतीतील भाडेकरूंसोबत माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान करारपत्र केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आजमितीस सुमारे ६ वर्षांहून अधिक कालावधी उलटूनही सदर इमारतीचा पुनर्विकास न झाल्याने इमारतीतील सर्वसामान्य रहीवाशी हवालदिल झाले असल्याची गंभीर बाब दिनांक ४ जून, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने संबंधित दोषी विकासकावर कारवाई करुन इमारतीच्या पुनर्विकासास गती मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०९-२०२१) :** (१) व (२) अशा आशयाचे करारपत्र केले, ही वस्तुस्थिती आहे.

सदर इमारतीच्या पुनर्विकासाबाबतचा प्रस्ताव कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या नगररचना विभागाकडे अद्याप प्राप्त झालेला नाही. त्यामुळे याबाबत महानगरपालिकास्तरावर निर्णय घेता आलेला नाही.

(३) सदर ठिकाणी सुरू असलेले बांधकाम परवानगी न घेता केले असून, सदर बांधकाम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २६०(२), ४७८ अन्वये अनधिकृत बांधकाम म्हणून घोषित करण्यात आलेले आहे.

संबंधित बांधकाम धारकास सदर अनधिकृत बांधकाम स्वखर्चाने निष्कासित करण्याचे दिनांक ०७/०७/२०२१ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

सदर अनधिकृत बांधकाम, बांधकाम धारकाने निष्कासित न केल्यास महानगरपालिकेकडून निष्कासित करण्याचे व कारवाई करीता झालेला खर्च संबंधिताकडून वसुल करण्यात येणार असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सर्व कृषी महाविद्‌यालयांना आयसीएआरची मान्यता देण्याबाबत

**(४९) १००३६ (१७-०६-२०२१) श्री.रमेश कराड, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.रमेशदादा पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी महाविद्‌यालये भारतीय कृषी संशोधन परिषदेने (आयसीएआर) ठरवून दिलेले किमान निकषही पूर्ण करु न शकल्याने उच्च शिक्षण घेऊ पाहणाऱ्या विद्‌यार्थ्यांचे नुकसान होत असून ज्या विद्‌यालयांना "आयसीएआर" ची मान्यता नाही तेथील विद्‌यार्थ्यांना एम.एस्सी. व अन्य प्रवेश परीक्षा देण्यास निर्बंध घातल्याने विद्‌यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे एप्रिल, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील चारही कृषी विद्‌यापीठातील केवळ ८ महाविद्‌यालयांना आयसीएआरची मान्यता आहे, अन्य महाविद्‌यालये कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु असून जादाचे प्रवेश शुल्क व व्यवस्थापन कोट्यातील १० टक्के जागांवरील प्रवेशाचा अधिकार या नफेखोरीतून या महाविद्‌यालयाचा कारभार सुरु असतानाही आयसीएआरची मान्यता न मिळण्याची कारणे काय आहेत, तसेच राज्यातील किती कृषी विद्‌यापीठांनी आवश्यक ते निकष पूर्ण न केल्यामुळे किती विद्‌यार्थ्यांचे नुकसान झाले आहेत,

(३) असल्यास, खाजगी महाविद्यालयांना परवानगी शासनाकडून दिली जात असताना किमान पायाभूत सुविधांची पाहणी करण्यासाठी पुरेशा प्रमाणात कर्मचारी वृंद नसल्याने कुठल्याही सुविधांची शहानिशा न करता कृषी महाविद्यालयांना परवानगी दिली जाते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील सर्व कृषी महाविद्यालयांना आयसीएआरची मान्यता मिळवून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०२-०९-२०२१) :** (१) नाही, हे खरे नाही.

भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचे मानांकन नसलेल्या महाविद्यालयातून पदवी प्राप्त विद्यार्थी पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमास पात्र आहेत तथापि, त्यांना भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली विद्यार्थ्यांकरीता राखीव असलेल्या जागांवर प्रवेश मिळणार नाही, ही बाब विद्यार्थ्यांना पदवी प्रवेश घेतेवेळी प्रवेश माहिती पुस्तिकेतुन निदर्शनास आणण्यात येते. जे विद्यार्थी आयसीएआर करीता राखीव जागांवर प्रवेश घेण्यास इच्छुक आहेत त्यांच्यासाठी राज्यात आयसीएआर मानांकन प्राप्त २८ शासकीय व १ कायमस्वरुपी विनाअनुदानित अशी एकूण २९ महाविद्यालये कार्यरत आहेत.
(२) हे खरे नाही.

चारही कृषी विद्यापीठांतर्गत कार्यरत २८ शासकीय महाविद्यालये व १ कायमस्वरुपी विनाअनुदानित महाविद्यालय असे एकूण २९ महाविद्यालयांना आयसीएआरचे मानांकन प्राप्त आहे.

कृषी परिषद स्तरावर दिनांक २३/०८/२०१९ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत सर्व “अ” व “ब” दर्जा प्राप्त कृषी व संलग्न महाविद्यालयांनी विद्यापीठामार्फत भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्याकडे मानांकनासाठी स्वयंअध्ययन अहवाल सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. महाविद्यालयांकडून याबाबत कार्यवाही सुरु असून अद्याप आयसीएआरकडे अहवाल सादर केलेले नाहीत.

(३) हे खरे नाही.

नविन खाजगी महाविद्यालयांना मान्यता देण्याआधी त्या संबंधित विद्यापीठाच्या समितीद्वारे महाविद्यालयासाठी उपलब्ध जमीन आणि इतर सोयी सुविधांची प्रत्यक्ष जावून पाहणी केली जाते. सदर समितीच्या शिफारशींनुसार महाविद्यालयाच्या मान्यतेची पुढील कार्यवाही करण्यात येते.

(४) कृषी परिषद स्तरावर दिनांक २३/८/२०१९ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीत सर्व "अ" व "ब" दर्जा प्राप्त कृषी व संलग्न महाविद्यालयांनी विद्यापीठामार्फत भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्याकडे मानांकनासाठी स्वयंअध्ययन अहवाल सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या कल्याण विभागातील सहायक नगर रचनाकार व नगर रचनाकार यांनी केलेल्या गैरव्यवहाराबाबत

**(५०) १००४३ (१३-०७-२०२१) डॉ.परिणय फुके, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : दिनांक ८ मार्च, २०२१ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक ५८८५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत लॉकडाऊन काळात कॅटेनमेन्ट झोन आणि रेड झोनमध्ये कोणत्याही प्रकारच्या बांधकामास मंजुरी देऊ नये असे मा.मुख्यमंत्र्यांचे आदेश असतानाही सहाय्यक नगर रचनाकार श्री.सुनील पाटील तसेच कल्याण विभागाचे नगर रचनाकार श्री.रघुवीर शेळके यांनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांतर्गत बांधकामांना मंजुरी दिल्याची बाब स्थानिक नागरिक श्री.मनोज कुलकर्णी यांनी दिनांक ३ जून, २०२० रोजी आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांच्या निदर्शनास आणून दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सहाय्यक नगर रचनाकार श्री.सुनील पाटील तसेच कल्याण विभागाचे नगर रचनाकार श्री.रघुवीर शेळके यांनी बांधकाम व्यवसायिकांशी आर्थिक संगनमत करुन पदाचा दुरुपयोग केल्याप्रकरणी त्यांचेवर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने श्री.रघुवीर शेळके, नगररचनाकार यांचेकडून दिनांक ९ जून, २०२० रोजीच्या कारणे दाखवा नोटीशी अन्वये खुलासा मागितला असून श्री.शेळके यांनी दिनांक २६ जून, २०२० रोजी सादर केलेल्या खुलाश्यानुसार त्यांच्यावर नियमानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०९-२०२१) :** (१) लॉकडाऊन काळात आपत्ती व्यवस्थापन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक १७/०४/२०२० च्या आदेशान्वये अपूर्ण अवस्थेत असलेल्या जोत्याची बांधकामे, तळघराची अपूर्ण असलेली बांधकामे पूर्ण करण्यासाठी अटी/शर्तीसह बांधकाम परवानगी दिली होती.

त्यास अनुसरून कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम सुरू असलेल्या १४ इमारतीच्या जोत्यांची, तळघराची कामे पूर्ण करण्यास परवानगी देण्यात आले, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) श्री.मनोज कुलकर्णी, स्थानिक नागरिक यांनी श्री.रघुवीर शेळके, नगररचनाकार, कल्याण विभाग यांची चौकशी करून त्यांना बडतर्फ करण्याबाबत दिनांक १७/०५/२०२० रोजी आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचेकडे तक्रार केली होती.

आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी श्री.रघुवीर शेळके, नगररचनाकार यांचा दिनांक ९/०६/२०२० च्या कारणे दाखवा नोटीशी अन्वये खुलासा मागितला.

श्री.शेळके यांनी दिनांक २६/०६/२०२० रोजी त्यांचा खुलासा सादर केला असून त्यावर नियमानुसार कार्यवाही सुरू असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.